

# मनोवेध

वैजयंती डांगे

# मनोवेध

वैजयंती डांगे

ई साहित्य प्रतिष्ठान

# मनोवेध

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मनोवेध  (कथासंग्रह)
वैजयंती डांगे
पत्ता - ११, स्नोसेम अपार्टमेंट्स
जिजामाता नगर, जेलरोड
नाशिकरोड, नासिक - ४२२१०१
मोबाईल नंबर - ९९२२६२७०९६
मेल आय डी - vaijayanti62@gmail. com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १७ जून २०१८

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

वैजयंती डांगे यांनी लिहीलेली व ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झालेली पुस्तके




मळभ : http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/malabh.pdf




आधुनिक शक्तिपीठे : http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shaktipeeth.jpg

# मनोवेधक कथांतून स्त्री मनाचा वेध

सौ. वैजयंती डांगे यांच्या कथा वाचून प्रस्तावना लिहिण्यासाठी समोर आल्या तेंव्हा नासिक ४०अंश तपमानाला टेकले होते. स्नानगृहात थंड पाणी अंगावर घेत रहावे याशिवाय काहीच करावेसे वाटत नव्हते. आय पी एल ची मॅच बघता बघता सहजच कथा चाळायला घेतल्या आणि मॅचचा निकाल कळलाच नाही. टी व्ही चालू होता, मी वाचत गेलो. संपल्या एव्हढ्यात ! असे मनात आले ! वैजयंतीचे यश इथेच आहे.

वैजयंतीच्या भाषेला एक काव्यात्मक ओघ आहे. वाचकाला गुंगवून टाकण्याची शक्ती भाषेत आहे. त्यांची प्रत्येक कथा आहे त्यापेक्षा अजून मोठी हवी होती असे शेवट पर्यंत वाटत राहते.

कथा वाचत असताना आपण कथा वाचत आहोत असे न वाटता आपण प्रत्यक्ष लेखिकेच्या मुखातून कथाकथन श्रवण करत आहोत असे वाटते.

सगळया कथा नायिका प्रधान आहेत. स्त्री ला स्त्री अधिक कळते हे जरी सत्य असले तरी लिहिणाऱ्यांनी या मर्यादा भंग करून बाहेर यायचे असते. “वैदेहीच्या गोष्टीत नायिकेच्या पतीची व्यक्तिरेखा विविधढंगी आहे. त्या व्यक्तिरेखेसाठी अधिक पृष्ठे खर्च करायला हरकत नव्हती.

'तेथे कर माझे जुळती ' हि कथा वाचतांना स्त्रीचे श्रेष्ठत्व स्पष्ट व्यक्त होते. अनाथाश्रमात आलेल्या बाळांचा जन्म वंशवृद्धीसाठी झालेला नसतो. केवळ आणि केवळ विकारातून किंवा विकृत, घृणास्पद विकारातून झालेला असतो. जे लोक अशी बालके स्वीकारतात त्यांना त्रिवार वंदन केले पाहिजे. या कथेत बाळ

घेतानाही उदारता आणि ते मतिमंद निघाल्यावर वात्सल्याचा एकांगी प्रवास वाचकांचे मन जिंकून घेते.

इतर कथाही त्याच तोलामोलाच्या आहेत. वाचतांना आपण त्यात गुंगून जातो. प्रत्यक्ष कथा डोळ्यांसमोर उभी राहते.

वैजयंती डांगे यांनी लिहीत रहावे. लहान कथांमधून दीर्घकथा आणि कादंबरीकडे वळावे

मनःपूर्वक शुभेच्छा

राजीव पुरुषोत्तम पटेल

# समर्पण

कै. ति. दादा

तुम्हाला जाऊन जवळ जवळ दीड वर्ष होत आले पण अजूनही तुमच्या नावामागे कै. लावताना मन कचरतय.

माझा पहिला लेख प्रसिद्ध झाला हे मला कळायच्या आधीच सकाळी सकाळीच तुमचा फोन आला. तुम्हाला खूप आनंद झाला होता आणि मग माझा लेख आणि तुमचा फोन आणि लेखावरचे तुमचे विवेचन हा सिलसिला तुम्ही होतात तोपर्यंत चालूच होता. तुमची खूप इच्छा होती माझ्या लेखांचे पुस्तक काढायची. आज तुमची इच्छा पूर्ण होत आहे. हे बघायला आज तुम्ही हवे होतात.

अलगद निसटून जाते रेती हातून

रहातो फक्त आभास

निघून जातात माणसे आयुष्यातून

उरतो अस्तित्वाचा फक्त भास

वानप्रस्थाश्रमी पाऊल पडता

आता उरलो उपकारापुरता

जगले ऐसे जीवन

जगन्मित्र होऊन

मृत्यूचेही केले स्वागत

सहज धरला त्याचा हात

कधी सोडली अमुची साथ

कळले नाही कोणा

अलगद होतात डोळे ओले

पाणावले राहते मन

आठवणीत गुंतून जातो

एक एक क्षण

का गेले कसे गेले

प्रश्न सारे निरर्थक

डोळ्यातून वाहतो फक्त

आठवणींचा पूर

दादा माझा हा पहिला कथा संग्रह तुम्हाला प्रेमपूर्वक अर्पण करताना मी खूप समाधानी आहे.

वैजयंती डांगे

# वैजयंती सुधीर डांगे



खरं तर साहित्यिक परिचय वगैरे देण्याइतकी काही मी कोणी लेखिका वगैरे नाही. लहानपणापासून वाचनाची आवड आहे. विशेषतः ऐतिहासिक पुस्तके आणि प्रवास वर्णन वाचायला आवडते. बाबासाहेब पुरंदरे, रणजित देसाई, मीना प्रभू, पु. ल. देशपांडे हे माझे आवडते लेखक आहेत बहिणाबाई, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर, बालकवी यांच्या कविता खूप आवडतात. एप्रिल २००० साली दहावीचा बागुलबुवा नावाचा माझा पहिला लेख दै. गावकरीत प्रसिद्ध झाला. त्यावर खूप चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या. तेंव्हा लक्षात आले की अरे आपण बऱ्यापैकी लिहू शकतोय. मग उघड्या डोळ्यांनी आणि मोकळया मनानी समाजात वावरताना स्त्रियांचे अनेक प्रश्न कळत गेले. आणि मी त्यावर आणि सामाजिक प्रश्नांवर लिहीत गेले. स्टडी अब्रॉड कन्सल्टन्ट म्हणून काम करताना, कायम ऐरणीवर असलेले मुलांच्या करिअरचे प्रश्न कळत गेले. मग ते प्रश्न पण मी माझ्या लेखांमधून मांडले. सुट्ट्यांमध्ये लहान मुलांसाठी गोष्टींचा कॉलम लिहिला. विशेषतः दै. गावकरी आणि दै. महाराष्ट्र टाइम्स मध्ये हे लेख प्रसिद्ध झाले आहेत. माझी ' मळभ ' नावाची कथा आणि आधुनिक नवदुर्गा ही विविध क्षेत्रातील पहिल्या महिलांवरची मालिका ई साहित्य प्रतिष्ठानवर प्रसिद्ध झाली आहे.

हा माझा पहिलाच कथा संग्रह आहे. यातील कथा वाचकांना आवडतील अशी आशा आहे. धन्यवाद!

वैजयंती डांगे

## कथानुक्रम


जिद्द

तोरण

तेथे कर माझे जुळती

वैदेहीची गोष्ट

# जिद्द

"घ्या ऽ ऽ ऽ मुलगी झाली" असे म्हणून नर्सने सुजाताच्या कुशीत बाळाला ठेवले.

सुजाता मनोमन आनंदली. तिला मुलीची खूप हौस होती. दोन मुलांच्या पाठीवर मुलगी झाली होती. घरात सगळेच खुश होते. भागवतांच्या घरात तीन पिढ्यांनंतर मुलगी झाली होती. लक्ष्मी घरात आली होती. लक्ष्मीचे रूप म्हणून नाव श्रिया ठेवले. टपोरे डोळे, भरपूर जावळ असलेली गोंडस श्रिया सगळयांचीच लाडकी होती. दोघे मोठे भाऊ तर बहिणीला अगदी फुलासारखे जपत.

वर्षा दीडवर्षाची श्रिया पायात छुमछुम घालून घरभर फिरायची. दोन्ही भावांनी हौसेने तिच्याकडून पहिल्यांदा राखी बांधून घेतली. तेंव्हा तिने पण हट्टाने दादाकडून राखी बांधून घेतली. आणि वरती मला दोन राख्या, तुम्हाला एकच राखी म्हणून त्यांना ठेंगा दाखवून चिडवले सुद्धा. दादा दादा म्हणून भावांच्या मागे मागे फिरायची. शाळेत जायच्या आधीच आईने शिकवलेली बडबडगीते तिने पाठ करून टाकली. मोदा, छोदा दोघे अभ्यासाला बसले की तिला पण पुस्तक हवे असायचे. मोठ्या भावाला मोदा (मोठा दादा) आणि छोट्या भावाला छोदा (छोटा दादा) म्हणायची. आई तिला पक्षांची फुलांची चित्र असलेली पुस्तके द्यायची. मग हा पक्षी कोणता, ते फुल कोणते असे प्रश्न विचारून ती भंडावून सोडायची.

लांब सडक केसांच्या दोन वेण्या घालून, युनिफॉर्म घालून, पाठीवर छानशी मिकीमाऊसची स्कुलबॅग असा सर्व जामानिमा करून स्वारी शाळेत जायला तयार झाली. मोदा, छोदा सारखी आता मी पण शाळेत जाणार असे सगळयांना

सांगत होती. शाळेत जायचे म्हणून आनंदाने नाचत होती. आईचे बोट धरून शाळेत आल्यावर मात्र, एवढी मोठी शाळा, खूप मुले पाहून घाबरली. आईचे बोट सोडायला तयार होईना. पण बाईंनी मुलांना बागेत नेल्यावर मात्र स्वारी खुश झाली. बागेतली झाडे, फुले पाहून श्रिया खुश झाली. आई घ्यायला आल्यावर शाळेतली बाग आणि बागेतली फुले, फुलपाखरे आईला कित्ती सांगू आणि काय सांगू असे झाले होते तिला.

श्रिया हळूहळू शाळेत रमू लागली. शाळेतून घरी आल्यावर आईला शाळेतल्या गमतीजमती सांगायला वेळ पुरत नव्हता. शाळेच्या स्नेहसंमेलनात या लहान मुलांची विविध वेशभूषा स्पर्धा ठेवली होती. बाईंनी मुलांना विचारले कोण कोण काय काय बनणार तेंव्हा या बाईसाहेब उठून म्हणाल्या "मेरी झांसी नहीं दूंगी". बाई बाई मी झाशीची राणी होणार. मग काय स्पर्धा होई पर्यंत घरीदारी दुसरा विषयच नव्हता. मोदा मला तलवार करून दे, छोदा मला ढाल करून दे, आई अग पण मला बाळ कुठे आहे पाठीवर बांधायला? आई तू जसं मला दवाखान्यातून आणलेस तसेच माझ्यासाठी पण एक बाळ आणूयात का दवाखान्यातून? तिच्या प्रश्नाने सगळयांनाच हसू आले. तुझी लाडकी बाहुली आहे ना ती तुझ्या पाठीवर बांधूया हं. आईने तिची समजूत घातली धावत जाऊन तिने बाहुली आणली. हं घे दे माझ्या पाठीवर बांधुन. बाबा तुम्ही मला शाळेत पोहोचवा. एकच धांदल उडाली, ती विजयश्री घेऊन घरी आल्यावरच शांत झाली.

निरनिराळ्या स्पर्धा, अभ्यास यात श्रिया रमू लागली. तिसरीचा रिझल्ट लागला. श्रियाचा दुसरा नंबर आला. मला पहिला नंबर का नाही दिला म्हणून रडून रडून गोंधळ घातला. कसेबसे समजावून घरी आणले. घरी आल्यावर समोर गोष्टीची पुस्तके पाहिल्यावर मात्र स्वारी खुश झाली. तहान भूक विसरून पुस्तकांत रमून गेली.

श्रिया मुळातच शांत आणि समजूतदार आहे. अभ्यासाकरता तिला कधी रागवावे लागले नाही. वर्षा मागून वर्ष जात होती. श्रिया मोठी होत होती. खेळ, अभ्यास, स्पर्धा गाजवत होती. बघता बघता श्रिया दहावीत गेली.

श्रिया चल आज चांगले तेल लावून देते केसांना. उद्या सुट्टी आहे ना तर शिकेकाईने न्हायला घालते. हो चालेल म्हणून श्रिया तेल लावून घ्यायला आईच्या समोर येऊन बसली. रविवार उजाडला. आईने छान रिठे घालून शिकेकाई उकळून घेतली. लांब आणि दाट केसांमुळे श्रियाचे नाहणे म्हणजे एक सोपस्कारच असतो. सुजाताने दोन्ही हातांनी केस अलगद वर उचलले आणि....... तिच्या मनात एकदम चर्रर्र झाले.

“श्रिया अग हा कसला डाग? काही लागले होते का तुला इथे?”

“नाही ग आई बघू कसला डाग आहे.” श्रिया मागे वळून वळून पाहण्याचा प्रयत्न करत होती पण तिला काही तो डाग दिसत नव्हता. तो लालसर पांढरा डाग बघून सुजाताच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. बापरे आता हे कुठले नवीन संकट आले आहे माझ्या या लेकीवर. काळजीने तिचे मन पोखरू लागले.

“जाऊदे तुला नाही दिसणार असा तो. उद्या आपण डॉक्टरांकडे जाऊ” म्हणत कसेबसे तिने न्हाणे उरकले.

रात्री तिने ही गोष्ट श्रियाच्या बाबांच्या कानावर घातली.

“श्रिया, आज शाळेत जाऊ नकोस आपल्याला डॉक्टरांकडे जायचे आहे.” सुजाताने श्रियाला सांगितले.

“अग आई पण मला काही दुखत नाहीये तर डॉक्टरांकडे कशाला जायचे?”

“नसते प्रश्न विचारू नकोस आवर पटापट.”

आई आपल्यावर का चिडली हे श्रियाला कळलेच नाही. दोघी डॉक्टरांकडे जाऊन आल्या आणि सुजाताची शंका खरी ठरली. श्रियाला कोडाची लागण झाली होती. ती डॉक्टरांना पुन्हा पुन्हा विचारत होती,

“डॉक्टर अहो आमच्या दोन्ही कडच्या घराण्यात कुणालाच हे असले काही नाहीये, मग हिलाच कसे आले? नक्की तेच आहे का?”

सुजाताचे अवसान गळाले होते. आज पाठीवर आहे तो पर्यंत लपवता येईल पण कदाचित लवकरच तो अंगभर पसरू शकेल, याची तिला कल्पना होती. श्रिया एकदम गप्प झाली. तिने स्वतःला खोलीत कोंडून घेतले. हे माझ्याच वाट्याला का हा एकच प्रश्न ती स्वतःला विचारत होती. श्रिया आणि तिची आई दोघी एकमेकींची समजूत घालत होत्या. दहावीचे वर्ष असल्याने शाळेत जायलाच हवे होते.

श्रियाने स्वतःला अभ्यासात बुडवून घेतले. हळूहळू ती शाळेत मैत्रिणींपासून आणि घरी सुद्धा भावांपासून दूर राहू लागली. ती खूप भांबावून गेली होती. कसे वागावे हेच तिला कळत नव्हते. तिला भीती वाटते आहे. हे उद्या अंगभर पसरले की मैत्रिणी, नातेवाईक सगळे माझा तिरस्कार करतील. घरात एक दिवस आईने दोन्ही भावांना तिच्या आजारपणाबद्दल समजावून सांगितले. त्यांना काहीतरी कुणकुण लागली होतीच पण नेमके काय ते कळत नव्हते.

आईला हे दोघे तिच्याशी कसे वागतील याची भीती वाटत होती. पण मोदा, छोदा, दोघांनी खूपच समजुतीने घेतले. दोघे तिच्या जवळ आले, हात हातात घेऊन तिची समजूत काढली. काहीही झाले तरी आम्ही दोघेही कायम तुझ्या सोबत आहोत हा विश्वास तिला दिला. तिला थोडा धीर आला.

दहावी, बारावी, पदवी असा शिक्षणाचा एकेक टप्पा करत असतानाच तिने स्वतःला ट्रेकिंग, सायकलिंग अशा तिच्या आवडत्या छंदांमध्ये गुंतवून घेतले. प्राणी, पक्षी, झाडे, निसर्ग हे तिचे जिव्हाळयाचे सोबती आहेत. तोपर्यंत तिच्या रोगाने देखील हातपाय पसरले होते. पण मानसिक सामर्थ्याने तिने रोगावर मात केली होती. पदवीधर होताहोता तिने समग्र विवेकानंद वाचून काढले. भगवद्गीता मुखोद्गत झाली. स्वतः शिकता शिकता तिने आजूबाजूच्या गरीब मुलांना मोफत शिकवायला सुरवात केली.

बीएस्सी झाल्यावर आई वडील लग्नासाठी स्थळे बघू लागले. तेंव्हा मात्र तिने अगदी निक्षून सांगितले “मी लग्न करणार नाही. हा माझा ठाम निर्धार आहे.”

“श्रिया अग हे काय वेड्यासारखे, अग कोड असणारी माणसे खूप असतात. मिळेल ग कोणीतरी चांगला मुलगा.” आई समजावण्याचा प्रयत्न करत होती.

पण तिचा निर्धार पक्का होता. ती आईला म्हणाली, “आई आता मी आधी एक वर्ष विवेकानंद केंद्रात एक वर्ष पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करणार आहे. आणि मग नोकरी. तू आता मोदासाठी स्थळं बघायला लाग. एक छान वहिनी आणून दे माझ्यासाठी.”

आता ती रोज केंद्रात जाऊ लागली. पुन्हा एकदा दैवाने तिच्यावर आघात केला. छोट्याशा आजाराचे निमित्त होऊन अवघ्या चार दिवसात तिच्या वडलांचे निधन झाले. आणि मग वर्षभरातच आई सुद्धा हे जग सोडून गेली.

तिन्ही भावंडे एकमेकांना आधार देण्याचा प्रयत्न करत होती, एकमेकांना आधार देत होती.

श्रिया उठून तिच्या खोलीत गेली, वज्रासनात बसून तिने भगवद्गीता म्हणायला सुरवात केली. एकदा, दोनदा, तीनदा, मन शांत होई पर्यंत ती म्हणतच राहिली.

धक्यातून थोडी सावरल्यावर ठरवल्या प्रमाणे तिने एकेक करून केंद्राच्या परीक्षा दिल्या. आणि मग पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून ती काम पाहू लागली.

"श्रिया अग घरी नाही का जायचे? किती उशीर झाला आहे बघितलेस का?" अमेय तिला विचारात होता.

"अरे बापरे आठ वाजून गेले निघायला हवे, एक तर आज माझी सायकल पण नाहीये. " असे म्हणत पसारा आवरून ती जायला निघाली.

अमेय म्हणाला चल मी सोडतो. "अरे पण तू कुठे उलट्या दिशेला येतोस. राहूंदेत मी जाते बसनी. "

"अग बाईकवर थोडे उलटे जायला कसला त्रास? इतक्या उशिरा तू एकटी जाऊ नकोस. चल बैस लवकर मी सोडतो तुला. "

हळूहळू उशिरा पर्यंत केंद्रात काम करणे आणि मग अमेयने तिला घरी सोडणे हे नित्याचेच झाले. तिला पण प्रत्येक कामात मदतीला अमेय लागू लागला. अमेय कधी आला नाही तर तिला चैन पडत नसे. एकदा सलग आठ दिवस अमेय केंद्रात आला नाही तर श्रिया खूप अस्वस्थ झाली. तो आल्यावर ती त्याच्यावर खूप

चिडली. “हे काय कुठे गेला होतास इतके दिवस? मी किती वाट पहात होते तुझी. बरं काही कळवले पण नाहीस. एखादा फोन तरी करायचा.”

तो तिला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता पण ती काही ऐकून घ्यायलाच तयार नव्हती.

“बरोबर आहे मी कोण आहे ना तुझी, मी वाट पहिली, काळजीने माझा जीव कासावीस झाला तरी तुला काय त्याचे.” असे म्हणून ती तरातरा घरी निघून गेली सुद्धा. रात्री विचार करता करता तिला वाटले चुकलेच जरा आपले, आपण खूपच बोललो का त्याला?

आणि अचानक तिच्या मनात विचार चमकला. मी अमेयच्या प्रेमात तर नाही पडले. हो तू जे बोललीस त्यावरून हेच सिद्ध होते की तू अमेयच्या प्रेमात पडली आहेस. तिच्या अंतर्मनाने ग्वाही दिली आणि ती चरकली. तिने जोरजोरात मान हलवली नाही नाही हे काय करते आहे मी ज्या वाटेवर जायचेच नाहीये मला त्याच वाटेवर का मी वळते आहे? नाही! असे होता कामा नाही. दुसऱ्या दिवशी तिने अमेयकडे चक्क दुर्लक्ष केले. असेच दोन तीन दिवस गेले. ती अमेयशी बोलत नव्हती. शेवटी काल अमेयने तिचा हात पकडला आणि विचारले ”श्रिया अशी काय वागते आहेस, माझ्याशी बोलत का नाहीस? मला लक्षात आलंय आपल्या दोघांच्याही मनात एकमेकांबद्दल एकच भावना आहे. हो ना खरं सांग मला जे तुझ्याबद्दल वाटतंय तेच तुला माझ्याबद्दल वाटतंय ना? खरंच मला तू आवडतेस. ”

“नाही अमेय माझ्या आयुष्यातील हा कप्पा मी कधीच बंद केला आहे. एका अवघड क्षणी मी घसरत होते पण कालीमातेची कृपा, तिने मला वेळीच सावध केले. माझे डोळे उघडले. नाही अमेय प्रेम, लग्न या वाटेवर मला जायचेच नाहीये.

अग पण का? काय चूक आहे त्यात? कुटुंब पद्धती हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. हो खरे आहे पण अमेय ज्या दिवशी या रोगाची चाहूल लागली त्याच वेळी मी ठरवले की प्रेम, लग्न, कुटुंब, मुले या गोष्टी माझ्यासाठी नाहीत. दया म्हणून कुणी माझ्याशी लग्न केले तर ते मला आवडणार नाही. ”

“नाही श्रिया तू चुकीचा विचार करते आहेस. मी तुझ्या बाह्यांगावर नाही तर अंतरंगावर प्रेम करतो. तुझे अंतरंग इतके निर्मळ आहे की त्यापुढे तुझ्या बाह्यांगाचा विचारही मनात येत नाही. ”

“अमेय मला माफ कर पण मी माझ्या निर्णयावर ठाम आहे. तू हा विचार मनातून काढून टाक. ”

“नाही श्रिया माझ्या भावना अगदी प्रामाणिक आहेत ग. मला कळतंय अमेय, मी तुझ्या भावनांचा आदर करते. ”

“पण ज्या वाटेला मला जायचेच नाही त्या वाटेचा मी विचार तरी का करू? अमेय माफ कर मला. ”

“श्रिया मला खात्री आहे एक ना एक दिवस तू मला हो म्हणशील. तुझ्या होकाराची मी वाट पाहीन. ” आणि तो तिथून निघून गेला.

आणि एक दिवस ती अण्णांसमोर म्हणजेच केंद्र प्रमुखांच्या समोर जाऊन उभी राहिली.

“ये श्रिया, कसे चालले आहे काम? काही अडचण नाही ना?” अण्णांनी तिला विचारले.

“काम चांगले चालले आहे अण्णा. पण मला तुम्हाला काही सांगायचे आहे. ”

"बोल ना अगदी निःसंकोचपणे सांग. "

"अण्णा मला कळलंय की आसाममधे आपल्या कामाचा विस्तार करायचा आहे, त्यासाठी कार्यकर्त्यांची फळी उभी करायची आहे. अण्णा माझी तयारी आहे, मी जाईन आसाम मधे माझे नाव द्या".

त्यांनी विचारायच्या आधीच ती सांगून मोकळी झाली. त्यावेळी आसाम मधे बोडो आंदोलनाने जोर धरला होता. अण्णांनी तिला तिथे जाण्यातले धोके मोठेपणाने समजावून सांगितले. तू नीट विचार कर आणि मग निर्णय घे. भावनेच्या भरात निर्णय घेऊ नकोस. नाही अण्णा मी पूर्ण विचार करूनच निर्णय घेतला आहे.

आसाम मधे काम करणे सोपे नव्हते. सतत डोक्यावर टांगती तलवार होती. केंव्हा गोळी लागेल याचा नेम नव्हता. पण न डगमगता कार्यकर्त्यांनी आपले काम सुरु केले. दिसपूरच्या जवळच्याच एका खेड्यात कार्यकर्त्यांनी आपले काम सुरु केले. सुरवातीला भाषेचा मोठा प्रश्न होता पण लवकरच आसामी भाषा येणारी दोन मुले त्यांच्या चमूत सामील झाली. घरोघरी जाणे, तिथल्या बायकांशी, मुलांशी बोलणे, कुणी आजारी असतील तर औषधे देणे. शिक्षणाचे महत्व पटवून देणे, स्वच्छतेचे महत्व सांगणे आणि वेळी स्वतः झाडू हातात घेऊ स्वच्छता करणे. असे सुरु झाले. लवकरच त्यांनी मुलांकरता शाळा सुरु केली. घरोघरी जाऊन मुलांना शाळेत पाठवा म्हणून आग्रह करू लागले. पहिले चार महिने असेच गेले. हळूहळू स्थानिक लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसू लागला. मुले शाळेत येऊ लागली. एक नाही दोन नाही श्रिया सलग पाच वर्ष तिथे राहिली. मोठे काम उभे केले. पाच वर्षांनी परत येऊन सरकारी नोकरीत रुजू झाली. ती इकडे आल्यावर त्या मुलांचे काय हा मोठा प्रश्न होता. मग धडपड करून तिथल्या काही मुलांसाठी सरकारी शिष्यवृत्ती मिळवून दिली. एक दिवस सहजच तिच्याकडे गेले तर पाच मुले घरात पाहून विचारले कोण ग ही मुले? अग माझीच मुले आहेत ही, तुला म्हणाले नव्हते

का आसाम मधून माझी मुले येतायत ते. त्या मुलांशी मग तिने माझी ओळख करून दिली. पुण्यात मुलांची रहाण्याची आणि शिक्षणाची व्यवस्था झाली.

"अरेच्या आज सकाळी सकाळी श्रियाचा फोन? हॅलो काय ग श्रिया आज सकाळी सकाळी.... "

मला थांबवत ती म्हणाली "अग माझा आम्रेश I A S ऑफिसर झाला. कामरान इंजिनिअर झाला आणि त्याला त्याला पूर्ण स्कॉलरशिप मिळाली आहे. तो अमेरिकेला चालला आहे पुढच्या शिक्षणासाठी. आणि अभिलाष मिलिट्री ट्रेनींग पूर्ण करून आता मेजर म्हणून रुजू होतोय. परवा त्याचा दीक्षांत समारंभ आहे. माझ्याकडूनच त्याला छातीवर बिल्ला लावून घ्यायचा आहे. "

तिचा आनंद अगदी ओसंडून वहात होता.

"श्रिया अग किती छान. खूपच आनंदाची बातमी आहे ग. ए आपण या सगळयांना छान छोटीशी पार्टी देऊयात. "

"अगदी माझ्या मनातले बोललीस बघ. "

श्रियाचे लग्न झाले नाही तिला स्वतःचे मूल नाही पण आज ती तीन तीन यशस्वी कर्तबगार मुलांची आई झाली आहे. त्यांच्या यशात तिचा खूप मोठा वाट आहे.

"आई तू एअरपोर्टवर सोडायला आली नाहीस तर मी जाणार नाही. " काम्रानने त्याचा निर्णय सांगितला होता.

"आई तुझा आशीर्वाद घेतल्याशिवाय मी कामावर रुजू होणार नाही. " आम्रेश तिला भेटायला येतोय.

आता श्रियाला नर्मदा परिक्रमाचे वेध लागले. परिक्रमा केलेल्यांचे अनुभव ऐकून ती खूपच प्रभावित झाली होती. तिने नोकरीतून निवृत्ती घेतली. परिक्रमेची तयारी सुरु झाली.

“अग तू इतकी भाविक कधीपासून झालीस?” मी विचारले.

“नाही ग पुण्य वगैरे मिळावे असा काही विचार नाही. पण आजूबाजूचा निसर्ग मला खुणावतोय. ”

तिच्या दोन मैत्रिणी तिच्या बरोबर होत्या.

ती नर्मदा परिक्रमा पूर्ण करून आली त्याचे उद्यापन पण झाले. पण आतून ती कुठेतरी अस्वस्थ आहे.

शेवटी आज मी तिला विचारले, “श्रिया काय झाले? तू अस्वस्थ का आहेस?”

“अग बाकी सगळे ठीक आहे ग. परिक्रमा चांगली झाली. आयुष्य अजून अनुभव संप्पन झाले, त्या सहा महिन्यात निसर्गाची वेगवेगळी रूपे अनुभवली तसेच तिथल्या लोकांचे पण अनुभव घेतले.

“पण नर्मदा प्रकल्पग्रस्तांचे हाल बघवत नाहीत ग. लोकांना कामधंदा नाही, मुलांना शिक्षण नाही. गरिबी, बेकारी, व्यसनाधीनता यांनी पिचून गेले आहेत ग तिथले लोक. तिथे जाऊन त्या मुलांसाठी शाळा सुरु करायचे माझ्या मनात आहे. ”

“धन्य आहे बाई तुझी. ” आम्ही कोणी काही सांगितले तरी तिच्या निर्णयात बदल होणार नाही हे माहिती असल्याने मुकाट्याने तयारीला लागलो.

एका N G O ने मदतीचा हात दिला आणि बघता बघता लेपा येथे विस्थापितांच्या मुलांसाठी शाळा सुरु झाली. सुरवातीला चार मुले शाळेत येत होती. आणि आज वेगवेगळया आठ वस्त्यांवर आठ शाळा सुरु झाल्या आहेत. या कार्याच्या माध्यमातून आज ती किती तरी मुलांना घडवत आहे. अनेकांना व्यसनांच्या विळख्यातून सोडवत आहे.

आज महिला दिनाच्या निमित्तानी तिच्या कार्याची दखल घेऊन सरकार तिचा आणि तिच्या कार्याचा गौरव करत आहे. “आज त्या कितीतरी मुलांच्या यशोदा झाल्या आहेत” अशा शब्दात तिचा गौरव होत आहे. सत्काराला उत्तर देताना ती म्हणाली “यात माझे श्रेय काही नाही. नर्मदामय्याने या कार्याची मला प्रेरणा दिली. ही मला दिलेली थैली मी शाळेच्या कामासाठी देत आहे. मी तुम्हा सर्वांची खूप आभारी आहे. ” आणि प्रचंड टाळयांच्या कडकडाटात श्रिया खाली बसली.

घरी आल्यावर दोन्ही भावांनी तिला कडकडून मिठी मारली. “श्रिया जिंकलीस तू सॅल्यूट आहे तुला. आज आपले आई बाबा असते तर किती आनंद झाला असता त्यांना. तुझे भाऊ असल्याचा आज अभिमान वाटतोय आम्हाला. आज कसं वाटतंय तुला?”

“खरं सांगू का दादा आज थोडं मागे वळून बघताना मी लग्न न करण्याचा घेतलेला निर्णय घरात तुम्हाला कुणालाच पटला नव्हता. तुम्ही माझ्यावर रागावला होतात. पण मी माझ्या निर्णयाशी ठाम राहिले. माझ्या अंगावर कोड उमटणे आणि मग माझा लग्न न करण्याचा निर्णय हे माझे सुदैव म्हणावे की दुर्दैव हे कळत नाहीये. पण आज मी माझ्या आयुष्यात खूप समाधानी आहे हे मात्र अगदी खरं. ”

समोर अमेय तिच्याकडे बघत उभा होता. ती त्याच्या जवळ आली त्याचे हात हातात घेऊन म्हणाली “अमेय आता तरी मला माफ करशील ना? “

# तोरण

"शलाका अग तोरण झाले का बांधून? आई रवा घेतलास का भाजायला? अगबाई तुळशी ठेवायच्या राहिल्या वाटते. "

साधनाची नुसती धावपळ उडाली होती. आज जोशींच्या घरात आनंदाला अगदी उधाण आले होते. आज जवळपास दहा वर्षांनी घरात कार्य होत होते. शलाकाचे आजी आजोबा, काका काकू, मामा मामी सगळे जण जमले होते. आनंदाला कारण ही तसेच होते. आज शलाका डॉक्टर झाली होती. तिने सर्जरी मध्ये गोल्डमेडल मिळवले होते. शेखर आणि साधनाचे स्वप्न पूर्ण झाले होते.

"शलाका पूजेला कोणाला बसायला सांगूयात ग?" साधना शलाकाला विचारात होती. "तुझे आजोबा खाली नाही बसू शकणार मग विकास भाऊजींना सांगूयात का पूजेला बसायला?"

"आई, आई एक मिनिट, जरा शांत हो, आणि हे बघ पूजा माझ्यासाठी घालते आहेस ना, मग पूजेला मीच बसणार. " शलाकाने साधनाला ठामपणे सांगितले.

"अग शलाका आपल्याकडे बायकांनी पूजेला बसायची पद्धत नाहीये. बायका फक्त नवऱ्याबरोबर पूजेला बसू शकतात. "

“अग आई हे खूप जुन्या काळातले विचार आहेत. आज मुली बुलेट ट्रेन चालवतात, चंद्रावर आणि मंगळावर सुद्धा पोहोचल्यात मुली. शिवाय मला भाऊ नाही तेंव्हा बाबांना अग्नी मीच दिला ना? मग आता पूजा पण मीच करणार. मी तुमची मुलगाच आहे. तुम्ही सुद्धा मला असेच वाढवले आहे ना? मुलगी म्हणून कधी वेगळी वागणूक नाही दिलीत. कुठलीही जाचक बंधने नाही टाकली. मग आता हे जुने विचार सोड.” शलाका आईला समजावत होती.

साधना तिला म्हणाली “अग मला पटतंय ग. पण तुझ्या आजोबांनी नाही मानले तर?”

“आई तू काळजी नको करुस मी आजोबांची समजूत घालीन.”

पूजेच्या आदल्या दिवशी रात्री जेवणे आटोपल्यावर सगळेच जणं हॉल मध्ये गप्पा मारत बसले होते. तेंव्हा शलाकाने सगळयांना सांगितले की उद्या मी पूजेला बसणार आहे. आणि सगळयांनी ते सहजतेने आणि आनंदाने मान्य पण केले होते.

पहाटे लवकर उठून शलाकाने दारासमोर सुरेख रांगोळी काढली. मग पूजेची सगळी जय्यत तयारी पण केली.

“शलाका अग कुठे आहेस?” तिला शोधत साधना तिच्या खोलीत आली. तिने पाहिले शलाका पूजेसाठी तयार होत होती.

साधना तिच्या हातातली साडी शलाकाला देत म्हणाली “शलाका आज पूजेसाठी ही साडी नेसशील का?”

"हो नेसेन की." साधनाने साडीवरून हळुवारपणे हात फिरवला. तिच्या डोळ्यातले पाणी बघून शलाकाने आईचे हात हातात घेत विचारले "काय झाले? बाबाची आठवण आली ना?"

"हो ग दरवर्षी हीच साडी नेसून मी तुझ्या बाबांबरोबर पूजेला बसायची."

शेखरच्या आठवणीने दोघींना गहीवर दाटून आला होता.

तेवढ्यात "झाली का तयारी " म्हणत गुरुजी पण आलेच. दिक्षीत काका म्हणजे शलाकाच्या बाबांचे मित्र त्यामुळे त्यांच्या वागण्या बोलण्यात मोकळेपणा होता. ते घरच्या सारखेच होते.

"हो काका बघा तुम्ही सांगितल्याप्रमाणे सगळी तयारी केली आहे."

"अरे वा अगदी छान तयारी केली आहेस हो. रांगोळी पण सुंदरच काढली आहे हो डॉक्टरीणबाई."

"हे काय हो काका तुम्ही काय डॉक्टरीणबाई म्हणता" असे लटकेच म्हणत शलाकाने त्यांच्या हातात दुधाचा ग्लास दिला. मग अगदी साग्रसंगित पूजा झाली.

"बरं पूजेला कोण बसणार आहे, विकास तू बसणार आहेस का, कि दादासाहेब तुम्ही बसतेय?"

"नाही नाही आम्ही कोणीही पूजेला बसणार नाही आहोत" दादासाहेब म्हणाले.

"अरे मग पूजा कोण करणार?" गुरुजींनी गोंधळून विचारले.

“असे गोंधळून जाऊ नका गुरुजी आज पूजेला आमची शलाका बसणार आहे.” दादासाहेबांनी कौतुकाने नातीकडे पाहत सांगितले. पुढे कुठलेही प्रश्न उपस्थित होऊ नयेत म्हणून दादासाहेबांनी गुरुजींना पूजेची घाई केली.

धूप, उदबत्ती, फुलांचा वास घरभर दरवळत होता. घरात वातावरण प्रसन्न होते. आरती झाली आणि साग्रसंगीत पणे पूजा संप्पन्न झाली. साधनाने आज तिच्या जवळच्या हितचिंतकांना जेवायला बोलावले होते. पुरणपोळीचा घमघमाट सुटला होता. शलाका कर्तेपणाने सगळीकडे लक्ष देत होती. अधून मधून दोघी एकमेकींचे भरून येणारे डोळे हलकेच पुसत होत्या. दोघीनाही शेखरची उणीव जाणवत होती. शलाकाचे आजी आजोबा सुद्धा लेकाच्या आठवणीने ओले झालेले डोळे टिपत होते. सगळयांच्याच मनात सुखदुःखाच्या ऊन सावलीचा खेळ चालू होता. जेवणे होऊन मागची आवराआवर होई पर्यंत दुपारचे तीन वाजले. सकाळपासून दगदग झाली होती सगळेच दमले होते. विश्रांतीसाठी सगळेच जरा पहुडले. पण साधनाला मात्र अजिबात झोप येत नव्हती.

“शेखर बघितलंस? छान झाली ना पूजा. शलाका सुद्धा किती जबाबदारीने पुढाकार घेऊन सगळे करते आहे. मोठी झाली हो आपली लेक. आज आपले स्वप्न पूर्ण झाले. आपली शलाका डॉक्टर झाली. नुसती डॉक्टर नाही बरका, मोठी सर्जन झाली आहे. ते सुद्धा गोल्ड मेडल मिळवून. तिला मिळालेले गोल्डमेडल शेखरच्या फोटो समोरच ठेवले होते. घरी दारी सगळीकडे खूप कौतुक होतंय रे तिचे. तुलाही खूप आनंद झाला आहे ना. मला माहिती आहे तू असतास तर तिला अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचला असतास. आज तुझी खूप आठवण येते आहे रे. तुझ्या लेकीचे कौतुक बघायला तू हवा होतास. आपण दोघांनी पाहिलेले स्वप्न एकटीने पूर्ण करताना मी थकून गेले रे. अर्ध्यावर डाव टाकून तू आम्हाला दोघीना सोडून गेलास. तुला माहिती होते का रे तू असा अर्ध्या डावावरून जाणार आहेस ते.

तू मला नेहेमी म्हणायचास मी नसलो तरी आपले स्वप्न मात्र तू नक्की पूर्ण कर. तू इतकी अचानक एक्झिट घेतलीस, मी अगदी खचून गेले. तुझ्या शिवाय जगण्याची कल्पनाच सहन होत नव्हती."

साधना शेखरच्या फोटो समोर उभी राहून मन मोकळे करत होती. आज एकीकडे तिची लेक सर्जन झाली होती तर ज्याच्याबरोबर आयुष्याचे स्वप्न पहिले तो जिवाभावाचा जोडीदार हा आनंद शेअर करायला सोबत नव्हता. गेली दहा वर्ष हे दुःख काळजात बंद करून लेकीसाठी खंबीरपणे ती उभी होती. आज मात्र काळजाचा तो बंद कप्पा उघडला होता आणि दुःख डोळयावाटे पाझरत होते. सासूबाई हळूच तिच्या जवळ आल्या. तिच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाल्या " साधना आज जिंकलीस हो तू. आम्हाला तुझा अभिमान वाटतोय. साधनाने सासूबाईंचे हात अलगद हातात घेतले. दोघी बराच वेळ बसून होत्या.

शेखर साधनाच्या आयुष्यात शलाकाच्या रूपाने आनंदाचा चैतन्याचा झरा अवतरला होता. अवखळ, हसरी, गोबऱ्या गालांची, यांची छोटी परी घरीदारी सगळयांचीच लाडकी झाली होती. दोघांनी ठरवून टाकले होते तिला काही काही म्हणून कमी पडू द्यायचे नाही. खूप खूप शिकवायचे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात, लहानपणीच शलाकाच्या बुद्धीची चुणूक दिसू लागली. इतर मुलींसारखी ती कधीच बाहुला बाहुली किंवा भातुकली खेळली नाही. एका दिवाळीत मोठ्या हौसेने शेखरने बोनस मिळाल्यावर लेकीसाठी बार्बी आणि तिच्या घराचा सेट आणून दिला होता. पण शलाका त्यात फारशी रामलीच नाही. तिचा आवडता खेळ म्हणजे डॉक्टर डॉक्टर. तिच्या काकांनी तिला खेळातला डॉक्टरचा सेट भेट दिला होता तिच्या खेळात ती कायम डॉक्टर असे आणि आई बाबा, मित्र मैत्रिणी शेजारी पाजारी सगळे तिचे पेशन्ट. कायम सगळयांना आजारी पडायचे नाटक करावे लागे. आणि तेंव्हाच शेखर साधनानी तिला डॉक्टर बनवायचे पक्के ठरवून टाकले.

आणि मग सुरु झाले जास्त काम, जास्त पैसे, जास्त काटकसर. काही झाले तरी पैशासाठी शिक्षण अडता कामा नये. हळूहळू शलाका मोठी होत होती. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या शलाकाला परमेश्वराने बुद्धिमत्तेची देणगी मात्र सढळ हस्ते दिली होती. शलाका शाळेत जाऊ लागली आणि तिच्या बुद्धिमत्तेला धुमारे फुटू लागले. निरनिराळया स्पर्धातून ती चमकू लागली. अभ्यासात पण तिने पहिला नंबर कधी सोडला नाही. चौथीची स्कॉलरशिप सातवीची स्कॉलरशिप, दहावी असा एक एक टप्पा यशस्वीपणे पार पडला. यशाचा आलेख वरवरच जात राहिला. दोघांनाही लेकीचा अभिमान वाटत होता. मुलगा नसल्याची खंत वाटत नव्हती. अभ्यासात चमकत असतानाच एकीकडे साधनाने तिला उत्तम संस्कारांचे बाळकडू पाजले होते. शाळेत सगळया शिक्षकांची ती लाडकी विद्यार्थिनी होती. सगळयांनाच तिच्याकडून मेरिट मधे येण्याची अपेक्षा होती.

बघता बघता शलाका बारावीत गेली. क्लास, कॉलेज, प्रॅक्टिकल्स, शलाका अभ्यासात पार बुडून गेली होती. शेखर साधना तिचे खाणेपिणे, वेळा सांभाळण्यात मग्न होते. बघता बघता वर्ष संपले आणि परीक्षा आठ दिवसांवर येऊन ठेपली.

आज सकाळपासूनच साधनाला अस्वस्थ वाटत होते. तिचा उजवा डोळा लवत होता. सकाळी सकाळी शलाकाचा दुधाचा कप हातून पडून फुटला होता. तिच्या मनात शंकेची पाल सारखी चुकचुकत होती.

“शलाका तुला बरे वाटते आहे ना? काही त्रास तर नाही होत आहे ना?” ती शलाकाला सारखी विचारत होती.

“काय झाले आई असे सारखे का विचारते आहेस? “ शलाकाने आईला विचारले.

साधना म्हणाली “काही नाही ग सहजच विचारले.”

“आई तू काहीतरी लपवते आहेस. तुझ्या चेहेऱ्यावर काळजी स्पष्ट दिसते आहे. खरे सांग काय झाले आहे?”

शेवटी साधनाने आपली मनातली शंका तिला बोलून दाखवली.

“आई अग काय हे, मी डॉक्टर होणार आहे. मी सायन्स शिकते, या अशा गोष्टींवर काय विश्वास ठेवतेस. अग हे सगळे मनाचे खेळ असतात. तू अजिबात काळजी करू नकोस, माझी अगदी उत्तम तयारी झाली आहे.”

शलाकाने साधनाची समजूत घातली आणि ती अभ्यासाला बसली. खरंय मन चिंती ते वैरी ना चिंती असे म्हणत साधना स्वयंपाकाला लागली. तिचे मन मात्र शांत नव्हते. तितक्यात फोन वाजला, साधना दचकून धावत बाहेर आली. तोपर्यंत शलाकाने फोन घेतला होता. “हॅलो मी शलाका बोलतेय........ काय ........ कुठे......... “ शलाकाने कसाबसा फोन ठेवला आणि ती आईकडे धावली. “आई चल लवकर आपल्याला हॉस्पिटल मध्ये जायचे आहे”

“अग काय झाले कोण आजारी आहे?.” साधनाच्या काळजाचा ठोका चुकला होता.

“तू चल मी सांगते सगळे”

दोघी घाईघाईत हॉस्पिटल मध्ये पोहोचल्या पण उशीर झाला होता. ऑफिसमध्ये काम करता करता शेखर अचानक कोसळला होता आणि तिथेच काळानी त्याच्यावर झडप घातली होती. सगळं संपलं होतं. दोघींवर दुःखाचा डोंगर कोसळला होता. मग सगळे सोपस्कार पार पडून शेखरची बॉडी घरी आणली.

ऑफिसच्या लोकांनी खूपच सहकार्य केले. सगळया फॉर्मॅलिटीज जबाबदारीने पार पडल्या. सगळेच शलाकाला आणि साधनाला सावरण्याचा प्रयत्न करत होते.

मुलगा नाही. अग्नी कोण देणार बाहेर चर्चा सुरु झाली. शलाका पुढे झाली मी वारस आहे तेंव्हा अग्नी मीच देणार. मन घट्ट करून तिने तिच्या बाबाला अग्नी दिला. तीन दिवसांनी पुढचे सगळे सोपस्कारही आटोपले. दोघींच्या दुःखाला पारावर नव्हता. डोळयातल्या पाण्याला खळ नव्हता. दोघी भिंतीशी निश्चिलपणे बसून होत्या.

पहाटे चारचा गजर झाला आणि साधना दचकून भानावर आली. शलाका रोज चार वाजता अभ्यासाला उठत असे. आता कसली परीक्षा आणि कसले काय, सगळं संपलं, म्हणून दोघी एकमेकींना आधार देण्याचा दुबळा प्रयत्न करत राहिल्या.

सकाळी सकाळी साधनाची मैत्रिण नेहा चहा घेऊन आली. काही एक निश्चय करून ती शलाका जवळ बसली. " शलाका बघ जे झाले ते नक्कीच खूप वाईट झाले. तुमच्या आयुष्यातली तुझ्या बाबांची जागा दुसरे कोणीही भरून काढू शकणार नाही. हे दुःख आयुष्यभर आपल्या मनात रहाणार आहे. पण याच वेळी तुला खंबीर व्हायला हवे. आईला धीर द्यायला हवा. तुम्ही दोघीनी मिळून तुझ्या बाबांचे स्वप्न स्वप्न पूर्ण करायला हवे. लवकरात लवकर शिक्षण पूर्ण करून घराला आर्थिक हातभार लावायला हवा. तुझी जबाबदारी वाढली आहे आता."

"बघ पटतंय ना तुला?"

"हो पटतंय ग मावशी पण...", नेहाने शलाकाला पुढे बोलूच दिले नाही, " उठ सावर आता स्वतःला आणि चल माझ्या बरोबर."

"कुठे?" शलाकाने विचारले.

“माझ्या घरी”

“तुझ्या घरी? “ शलाकाने विचारले.

“हो! आजपासून तू माझ्या घरी रहायला येणार आहेस, आणि तिथूनच परिक्षेला जाणार आहेस. परीक्षा बुडली तर वर्ष वाया जाईल. हे तुझ्या बाबांना तरी आवडेल का?”

शलाकाला रडू आवरत नव्हते, “नाही ग मावशी मी परीक्षा नाही देऊ शकणार, मला काहीही आठवणार नाही, काही सुचणार नाही. आणि आईला एकटीला ठेऊन मी तुझ्याकडे कशी येऊ? शिवाय बाबाचे दिवस पण करायचे आहेत. नाही ग, नाही होणार माझ्याच्यानी. मी पुढच्या वर्षी परीक्षा देईन. तसेही मार्क चांगले नाही मिळाले की पुढची ऍडमिशन पण होणार नाही.”

इतका वेळ शांतपणे हे सगळे ऐकणारी साधना आता पुढे आली. “शलाका, नेहा म्हणते ते बरोबर आहे, तू माझी काळजी करू नकोस. शिवाय तुझे आजी आजोबा राहतील माझ्या सोबत.”

शलाकाने आजोबांकडे पाहिले. तसे आजोबा तिच्या जवळ आले आणि तिला जवळ घेत स्वतःचे दुःखाचे आवंढे गिळत म्हणाले, “शलाका काळजी करू नकोस आम्ही सगळे तुमच्या सोबत आहोत. काही दिवस आता आम्ही तुमच्या सोबतच राहणार आहोत. आमच्या लेकाने पाहिलेले स्वप्न तू पूर्ण कर.”

“आजोबा “ म्हणत शलाकाने त्यांना मिठी मारली. बराच वेळ ते तिला थोपटत होते. “आणि दोन पेपर मध्ये तुला पाच दिवस सुट्टी आहे, त्यावेळी

ज्ञानप्रबोधिनी तर्फे दहावा, बारावा सगळे व्यस्थित करून घेऊ" नेहा मधेच म्हणाली आणि शेवटी कसेबसे शलाकाला तयार करून नेहा तिला घरी घेऊन आली.

" हे बघ शलाका तू आता मार्क्स ऍडमिशन कसलाही विचार करू नकोस. तुला जशी जमेल तशी परीक्षा दे फक्त."

शलाका म्हणाली, "हो मावशी मी प्रयत्न करते. मला माहिती आहे हे सांगणे खूप सोपे आहे, निभावणे तितकेच अवघड. पण तू हे व्यवस्थित निभावून नेशील याची मला खात्री आहे ". नेहा तिला आधार देत म्हणाली.

नेहा रोज तिला पेपरला घेऊन जात होती. तिथेच थांबून पेपर संपल्यावर प्रथम तिला साधनाला भेटायला घेऊन जात होती. भेटल्यावर मायलेकी गळयात पडून रडत होत्या. आणि मग तिला घेऊन परत घरी येत होती. शलाका एक एक दिवस ओढत होती. अभ्यासाला बसल्यावर बाबाच्या आठवणींचा पूर डोळयात दाटून येत होता. कशीबशी परीक्षा संपली, C E T पण झाली.

बघता बघता रिझल्टचा दिवस उजाडला. सगळयांनाच खूप टेन्शन होते. शलाका तर सकाळपासून खोलीच्या बाहेर पण आली नव्हती. साडेअकरा बाराच्या सुमाराला रिझल्टचा पेपर आणि पेढे घेऊन नेहा दारात हजर.

"शलाका, साधना, अग कुठे अहात? बाहेर या, शलाकाचा रिझल्ट आणलाय बघा." शलाका हळूच बाहेर आली.

"मावशी मी पास झाले आहे का ग?"

“अग नुसती पास नाही, तू मेरिट मध्ये आली आहेस. मला खात्रीच होती, तुझा रिझल्ट उत्तम लागणार याची.” असे म्हणत नेहाने दोघींच्या तोंडात पेढा कोंबला.

“मावशी “ म्हणून शलाका नेहाच्या गळयात पडली.

“आज बाबा असता तर त्याला किती आनंद झाला असता “. तिघींच्या ही डोळयातून शेखरच्या आठवणीने अश्रुधारा वाहू लागल्या.

यथावकाश C E T चा पण रिझल्ट लागला. शलाकाचा मेरीटलिस्ट नंबर १९८ होता. त्यामुळे ऍडमिशनचा प्रश्नच नव्हता. मेरीटवर गव्हर्नमेंट कॉलेज मध्ये ऍडमिशन मिळाल्याने पैशाचाही प्रश्न आला नाही. उत्तम मार्क्स उत्तम ऍडमिशन, सुरवात तर छानच झाली होती. साधनाला कृतकृत्य झाल्यासारखे वाटत होते. शलाकाला रिझल्ट, ऍडमिशन, हॉस्टेलवर जाण्याची तयारी अशा सगळया गोष्टी साधना फोटोतल्या शेखर बरोबर शेअर करत होती. त्याच्या आठवणीने व्याकुळ होत होती. शलाका हॉस्टेलवर गेली की तिला एकटीला रहायचे होते ती स्वतः धीर गोळा करत होती आणि शलाकाला पण धीर देत होती.

आईला सोडून मुंबईला जाताना मात्र आईच्या काळजीने तिचे मन भरून आले पाय निघेना. साधनानेही मन घट्ट करून तिला निरोप दिला. एका डोळयात आनंद आणि एका डोळयात पोरकेपणाची वेदना घेऊन शलाका हॉस्टेलवर आली.

नासिक सारख्या छोट्या गावातून मुंबानगरीत ती प्रथमच आली होती. डबलडेकर्स, रस्त्यावरची अखंड ट्रॅफिक, लोकल्स आणि स्टेशनवरची ती गर्दी पाहून शलाका घाबरली होती. या महानगरात आपला निभाव कसा लागणार याची तिला भीती वाटायला लागली. असे वाटले आल्या गाडीने परत नासिकला निघून

जावे. ती सोबत आलेल्या काकाला म्हणाली सुद्धा, “ काका आपण परत जाऊ मला खूप भीती वाटतेय, मी नाही इथे राहू शकणार.”

कशीबशी जीव मुठीत धरून ती काका बरोबर होस्टेलला पोहोचली. रूम नंबर ४१२, तिला मिळालेली खोली. शोधात शोधात ती खोलीत आली. दोघीजणी आधीच खोलीत आलेल्या होत्या. स्नेहल आणि ज्योती. शलाका घाबरत घाबरत खोलीत आली. काकाच्या मदतीने तिने तिचे सामान लावले. हळूहळू त्या दोघींशी ओळख करून घेतली. स्नेहल नगर ची होती तर ज्योती जळगावची होती. कॉलेज सुरु झाले आणि पहिल्याच दिवशी डेडबॉडी समोर आली आणि अंगावर शहरे उठले. ऐकून माहिती होते पण प्रत्यक्ष बॉडी समोर आल्यावर मात्र थोडा वेळ शलाका सुन्न झाली. तिघी जणी एकमेकींचे हात हातात घट्ट धरून थोडा वेळ बसल्या. आणि इथून त्यांची मैत्री व्हायला सुरवात झाली.

हळूहळू तिघीही कॉलेज, अभ्यास, आणि मुंबईचे वातावरण या सगळयाला सरावल्या. एक दिवस शलाका एकटीच काही मेडिकल इंस्ट्रुमेंट्स आणायला बाहेर गेली होती आणि अचानक जोरदार पाऊस सुरु झाला आणि बघता बघता सगळीकडे पाणी भरले. आणि मुंबई बंद झाली. तिला काय करावे परत कसे जावे कळेना. ती रडायला लागली. तिला आठवले आईने सांगितले होते, बाहेर काही अडचण आली तर शक्यतोवर चेहेरा शांत ठेवायचा आणि पोलिसांची मदत मागायची. मग तिने धीर एकवटला आणि पोलिसांच्या मदतीने कशीबशी हॉस्टेलवर येऊन पोहोचली. पोचल्यावर मात्र तिचा धीर सुटला. तिला रडू आवरेना. तिला बाबाची खूप आठवण येत होती. आज बाबा हवा होता असे म्हणून त्याच्या आठवणीने तिला आणखीनच रडू येत होते. एकटेपणाची जाणीव प्रकर्षाने जाणवत होती. तिच्या दोन्ही मैत्रिणींनी मात्र तिला धीर दिला, सावरलं. हळू हळू ती या नवीन वातावरणाला सरावत होती. खंबीर होत होती.

बघता बघता M. B. B. S. , मग इंटर्नशिप आणि मग सर्जरी मध्ये गोल्डमेडल. यशस्वीपणे एक एक टप्पा पार करत शलाका आई बाबाच्या स्वप्नांच्या गावाला पोहोचली सुद्धा. तिच्याच कॉलेज मध्ये तिला सिनिअर रेसिडेंटशिप पण मिळाली.

शलाकाचे कौतुक करायला, तिचे यश साजरे करायला आणि देवाचे आभार मानायला आज साधनाने सत्यनारायणाच्या पूजेचा घाट घातला होता.

एका डोळयात बाबाची आठवण आणि दुसऱ्या डोळयात त्याचे स्वप्न पूर्ण केल्याचा आनंद घेऊन शलाका आलेल्या पाहुण्यांना जातीने तीर्थप्रसाद देत होती. साधना कृतकृत्य होऊन इतकी गुणी मुलगी पोटी दिल्याबद्दल देवाचे आभार मनात होती, आणि नजरेनेच लेकीची दृष्ट काढत होती.

# तेथे कर माझे जुळती

कर्र ssssss कच्च sssss

“अरे अरे!!! मुलगा गेला. धावा! पकडा ड्रायव्हरला! सोडू नका!!!”

एकच गोंधळ उडाला, धावाधाव झाली. दुकानात औषधे घेत उभी असलेली मुग्धा सुद्धा काय झाले म्हणून बघायला वळली. इतका वेळ शेजारी उभा असलेला शुभम कुठे दिसेना म्हणल्यावर तिच्या काळजाचा ठोकाच चुकला. हातातले सामान तिथेच टाकून जिवाच्या आकांतानी ती बाहेर धावली. शुभमsssss ती तीरासारखी गर्दीत घुसली. समोर रक्ताच्या थारोळयात पडलेला शुभमचा छिन्न विच्छिन्न देह पाहून मुग्धा तिथेच कोसळली. लोकांनी तिला कसेबसे सावरले. पाणी दिले. तिच्या तोंडावर पाणी मारले. ती शुद्धीवर आल्यावर तिच्या मोबाईल वरून मनोजला तिच्या नवऱ्याला कळवले.

मनोज आणि त्याचे दोन मित्र धावत पळत येऊन पोहोचले. मनोजला बघताच तिने हंबरडा फोडला. “ मनोज आपला शुभम....... “ सगळी परिस्थिती पाहून मनोजचे हातपायच गळाले. तो घाबरला. मनोज सुन्न झाला होता. तो प्रसंगच भयानक होता. समोर रक्ताच्या थारोळयात पडलेला शुभमच्या देह पाहून त्याच्या अंगाला कापरे भरले होते. मुग्धाची सारखी शुद्ध हरपत होती. मनोजचा

मित्र त्याला धीर देत म्हणाला “मनोज धीरानी घे. वहिनींची अवस्था बरी नाही. मी त्यांना घेऊन घरी जातो. तू आणि महेश पुढची व्यवस्था पहा.

हळूहळू मनोज थोडा सावरला. मग त्याने मला फोन केला आणि थोडक्यात सगळे सांगितले. गरज पडली तर म्हणून मी त्यांच्या डॉक्टरांना बोलावून घेतले. मुग्धाला कसेबसे घरात आणून थोडे पाणी पाजून सोफ्यावर बसवले. तिला दुःखानी ग्लानी येत होती.

तिकडे पोलिसांनी पंचनामा करून शुभमचा देह पोस्टमॉर्टेमसाठी सिव्हिलला पाठवला. मनोज पण तिथे पोहोचला. पुढे पोलीस, हॉस्पिटल, पोस्ट मॉर्टेम सगळे सोपस्कार आटोपले. बापाने मुलाला खांदा देणे म्हणजे अगदी काळीज पिळवटून टाकणारा प्रसंग असतो. पण शेवटी सगळे सोपस्कार पार पाडावेच लागतात. मनावर दगड ठेऊन मनोजने सर्व सोपस्कार पार पाडले. आलेले नातेवाईक एक एक करून परत गेले आणि घर रिकामे झाले. रिकामे घर मुग्धाला खायला उठले. तिला काही सुचत नव्हते. शुभमच्या आठवणीने मनात काहूर माजत होते. ती तासंतास निश्चिल बसून राहत होती. मनोजचे रुटीन मात्र सुरु झाले होते

आणि हळू हळू सोसायटीत चर्चेला सुरवात. ' झाले ते चांगलेच झाले ' असेच साधारण सगळयांचे मत होते. एका दृष्टीने ते बरोबर पण होते. पण वयाच्या पंधरा सोळाव्या वर्षी अशा तऱ्हेने अपघातात गेलेल्या मुलाबद्दल असे बोलताना कुठेतरी मन हळवे होत होते.

आमची सोसायटी नवीनच होती. हळूहळू लोक राहायला येत होते. मी पण उत्सुकतेने शेजारी कोण येतंय याची वाट पाहत होते. एक दिवस बाहेर कुणाच्या तरी बोलण्याचा आवाज आला म्हणून सहज बाहेर डोकावले, तर माझ्या शेजारच्या घरात सामान लावण्याची गडबड चालू होती. मी एकदम खुश. चांगला

शेजार नशिबानेच मिळतो. देवा छान शेजार दे रे बाबा म्हणत मी ऑफिसला पळाले. घरात कोणकोण असेल, किती माणसे असतील, स्वभाव कसा असेल, असे अनेक विचार दिवसभर डोक्यात येत होते. मी शेजारच्यांची वाट पाहू लागले. माझी उत्सुकता वाढत होती.

सामान आले पण अजून माणसे कोणीच आली नव्हती. किती दिवस लावतायत यायला, माझी बेचैनी आणि उत्सुकता वाढत होती. आणि एका सकाळी शेजारच्या घरातून बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकला. आणि मी हुश्श केले आले एकदाचे. कोण आहे बघायची उत्सुकता होती. पण आज मला नेमकाच उशीर झाला होता त्यामुळे घाई घाईत ऑफिसला पळायला लागले.

संध्याकाळी ऑफिसहून आल्या आल्या बघितले तर शेजारचे दार उघडे होते. मी उत्सुकतेने डोकावलेच. म्हणले मी मृणाल, इथे शेजारीच राहते तुमच्या. साधारण माझ्याच वयाची एक बाई एका तान्हुल्याशी खेळात होती. मला पहाताच तिने मला घरात बोलावले. शोन्या बघ कोण आलय !!! छान छान मावशी आलीय. मग तिच्याशी ओळख करून घेऊन आणि तिच्या शोनुल्याशी थोडं खेळून मी घरी आले.

मी खुश, ती चांगली वाटली आणि तिचा तो शोन्या तर एकदमच गोडुला. अरे पण त्या गोडुशी खेळताना दोघांची नावे विचारायचीच विसरले होते. हळूहळू ओळख वाढत गेली, जाता येतां दोन मिनिटं शुभमशी खेळायची, त्याला हाक मारायची सवयच लागली होती. माझ्या मुलांना शुभम नावाचे नवे खेळणे मिळाले. हळूहळू आमची पण ओळख वाढत होती. मुग्धा, मनोज आणि शुभम असे छोटेसे कुटुंब होते त्यांचे. मनोज इंजिनिअर होता एका खाजगी कंपनीत मॅनेजर होता. मुग्धा M S C होती. पहिल्यांदा ती पण एका फार्मा कंपनीत नोकरीला होती.

शुभमसाठी तिने नोकरी सोडली होती. तिचा अख्खा दिवस शुभमच्या भोवती जात होता.

आम्ही दोघी साधारण एकाच वयाच्या आहोत. पण माझी मुले एक पाचवीत आणि एक दुसरीत. तर शुभम अवघा चार महिन्याचा होता. पण या बाबतीत मी कधीच मुग्धाला काही विचारले नाही. शुभमचे सगळे सण, वर्षाचा वाढदिवस अगदी थाटात साजरे झाले. त्याच्या वर्षाच्या वाढदिवसाला त्याचे दोन्ही आजी आजोबा काका मामा मावशी सगळेच आले होते. शुभम वर्षाचा झाला पण अजून रांगत नव्हता की बसत पण नव्हता. पण कधी कधी काही मुलांची वाढ उशिरा होते आणि काही मुले उशिरा बोलायला लागतात. असा विचार करून या गोष्टीकडे तसे थोडे दुर्लक्षच केले गेले.

बघता बघता शुभम दोन वर्षाचा झाला पण त्याच्यात फारशी काहीच सुधारणा नव्हती. आता आम्हाला सगळयांनाच त्याची काळजी वाटू लागली. मुग्धा त्याला सोफ्याच्या, उशीच्या आधाराने बसवत होती. शोनु आई म्हण आऽऽई , बाबा म्हण बाऽऽऽबा. ती त्याला बोलायला शिकवायचा प्रयत्न करत होती.

एक दिवस सकाळी सकाळी दाराची बेल वाजली आणि सारखी वाजतच होती. कोण आहे एवढ्या सकाळी सकाळी, आणि ही काय पद्धत झाली का बेल वाजवायची मी जरा चिडूनच दार उघडले. दारात मुग्धा उभी होती. तिच्या चेहेऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता. मृणाल चल लवकर चल. अग पण कुठे? अग चल तर खरं. शुभम आत्ता बाबा म्हणाला. चल बघ ना. आम्ही गेलो तर शुभम सोफ्याला धरून उभा होता आणि बा.. बा.. बा करत होता. कधी एकदा मनोज येतो आणि त्याला सांगते असे तिला झाले होते.

मनोज सारखे तिला समजावत होता, “मुग्धा अग आपण शुभमला डॉक्टरांकडे घेऊन जाऊ. वयाच्या बरोबर त्याची प्रगती होत नाहीये. सुरवातीला मुग्धाला हे पटत नव्हते. पण शुभम तीन वर्षाचा झाला. त्याचा बरोबरीची मुले शाळेत जाऊ लागली आणि शुभम आत्ता कुठे हात धरून चालू लागला होता आणि आssssई बाsssssबा असे एकेक अक्षर बोलत होता. शेवटी मनोज आणि मुग्धा शहरातील उत्तमातल्या उत्तम बालरोगतज्ञाकडे त्याला घेऊन गेले. सगळया टेस्ट्स झाल्या. आणि शुभम ही डाऊन सिन्ड्रोमची केस आहे असा निष्कर्ष निघाला.

हे ऐकून मुग्धा पार खचून गेली हे काय नशीब माझ्या वाट्याला आलाय म्हणून स्वतःलाच दोष देत होती.

मनोज म्हणाला, “मुग्धा हे बघ थोडा शांतपणे विचार कर. भावना आणि व्यवहार याची गल्लत करू नकोस.”

“ नेमके काय म्हणायचंय मनोज तुला?” “

हे बघ तसाही शुभम आपला मुलगा नाही आपण त्याला दत्तक घेतले आहे. आणि कायद्याने जर मूल अपंग निघाले तर दत्तक विधान रद्द करून ते मूल आश्रमात परत करता येते. आपण शुभमला आश्रमात परत सोडून देऊयात. असे मूल सांभाळणे खूप अवघड असते. आपले सगळे आयुष्य त्याच्या पायी वाया जाईल.”

“मनोजsssss काय बोलतोस तू हे मुग्धा किंचाळलीच. नाही नाही कुठल्याही परिस्थितीत मी शुभमला परत पाठवणार नाही. माझ्या जीवात जीव असे पर्यंत मी त्याला प्राणपणाने सांभाळेन. देवाने माझ्या मातृत्वाची परीक्षा घेण्यासाठीच त्याला माझ्या पदरात टाकले आहे.”

“मुग्धा शांतपणे विचार कर आणि मग निर्णय घे. “ मनोज म्हणाला.

“ विचार करायचा प्रश्नच नाही मनोज. मुळात माझ्या मनात कुठलाच प्रश्न नाही. माझा निर्णय झाला आहे. मी त्याला शेवट पर्यंत सांभाळणार आहे.”

“आणि मग आपल्या नंतर काय? कोण सांभाळेल त्याला? मनोज ने विचारले.

“माझा परमेश्वरच सांभाळेल त्याला. मनोज अरे या मागे सुद्धा परमेश्वराचा काहीतरी हेतू आहे असे नाही का तुला वाटत?

“म्हणजे? नेमकं काय म्हणायचे आहे मुग्धा तुला?”

“अरे बघ ना इतकी मुले होती आश्रमात, आणि खरे तर आपण मुलगीच दत्तक घ्यायची ठरवले होते. पण अचानक मला हाच का आवडावा? आणि आपण यालाच का दत्तक घ्यावे? अरे देवाला याची काळजी होती म्हणूनच आपल्याला ही बुद्धी झाली. आणि आपण याला घरी घेऊन आलो. तेंव्हा आता दुसरा कुठलाही विचार नाही करायचा. आपण आहोत तोवर याला सांभाळायचे.”

काळ हे कुठल्याही जखमेवर उत्तम औषध असते. मनोजच्या आधाराने मुग्धा हळूहळू या धक्क्यातून बाहेर आली. आता ती शुभमच्या बाबतीत जास्तच हळवी झाली. मनोज मात्र शुभमपासून दूर राहू लागला होता. शुभमची ट्रीटमेंट सुरु झाली त्याच बरोबर मंदिर, दर्गा सगळीकडे श्रद्धेने ती डोकं टेकवून आली. जो जे उपाय सांगेल ते सगळे ती करत होती. उपासतापास, नवस बोलत होती.

मनोज तिला समजावण्याचा प्रयत्न करत होता. “मुग्धा अग आपण दोघेही सुशिक्षित आहोत. उपासतापास नवस हे यावरचे उपाय नाहीत. ते करून शुभम मधे काहीही फरक पडणार नाही हे कळत नाहीये का तुला? तुझी तब्येत मात्र खराब होत चालली आहे.”

मुग्धा म्हणायची "मला कळतय रे पण आईची माया वेडी असते. कुठल्याही कारणाने आपले मूल बरे झाले पाहिजे. एवढेच तिला कळते. अशा वेळी या वेडया मनाला शास्त्र वगैरे काही समजत नाही."

अर्थात ती सुशिक्षित होती जागरूक होती त्यामुळे हे सगळे करत असतानाच तिने अशा मुलांना सांभाळायचे कसे, त्यांची काळजी कशी घ्यायची हे शिकून घेतले. तिने स्वतःच्या मनाची दारे बंद करून घेतली नातेवाईक, मैत्रिणी, सणवार, लग्न मुंजी सारखे समारंभ ही सगळी दारे तिने स्वतःच्या हातानी बंद केली.

आता ती आणि शुभम एवढेच तिचे विश्व राहिले त्या विश्वात मनोजसुद्धा नव्हता. शुभमचे संगोपन ती अतिशय काळजीपूर्वक करू लागली. छोट्या छोट्या गोष्टी त्याला करून दाखवत होती. त्याचा हात धरून त्याच्याकडून करून घेत होती. खरे तर तिचीच परीक्षा सुरु झाली होती. कासवाच्या गतीने का होईना पण शुभम ची प्रगती होत होती. तीन वर्षाच्या शुभमनी जेंव्हा अस्पष्ट, बोबडे का होईना पण तिला आई अशी हाक मारली तेंव्हा तिला झालेला आनंद कशातच मोजता येणार नव्हता. हळूहळू शुभम दहा वर्षाचा झाला. आधाराने का होईना पण चालायला लागला. मुग्धा रोज संध्याकाळी त्याचे छान आवरून देई. त्याला स्वच्छ कपडे घालून त्याचा भांग पडून देत होती. मग त्याला हाताला धरून मंदिरापर्यंत फेरफटका मारून येई. त्याच्या प्रतिक्षिप्त क्रियेवरून त्याच्या आवडीनिवडीचे ठोकताळे ती बांधत होती. जसे तिने भांग पाडला की लगेच तो हाताने विस्कटून टाकायचा. कधी कधी त्यांचा हा खेळ चालायचा. तिने भांग पडायचा आणि त्याने तो विस्कटायचा. त्याच्या वागण्यावरून त्याच्या आवडीनिवडी समजून घेत होती आणि त्या पुरवत होती. तिच्या कष्टाना फळ येत होते.

बारा तेरा वर्षाचा शुभम स्वतःच्या हाताने जेवणे, कपडे घालणे अशी स्वतःची कामे करू लागला. त्याची बोटे खूप छान लांबसडक होती. त्याला चित्र काढायचे वेड लागले. सुरवातीला रेषा सरळ येत नव्हत्या. तुटक तुटक चित्र काढायचा. मुग्धाने त्याला हात धरून सरळ रेषा काढायला शिकवले. चार सहा महिन्याच्या प्रयत्नानंतर शुभम खूप छान चित्र काढायला लागला. माझा शुभम किती छान चित्र काढतो म्हणून त्याची चित्र ती सगळयांना दाखवायची. दिवाळीच्या आधी दोघे मिळून ग्रीटिंग्ज बनवायची. सगळया नातेवाइकांना ओळखीच्यांना त्याने बनवलेली ग्रीटिंग्ज पाठवायची. तो कायम स्वतःच्या मनाने नेहेमी गणपतीचे चित्र काढायचा. शुभम चित्र काढायला बसला की तो त्यात रंगून जायचा. अगदी एकाग्र व्हायचा. मुग्धा म्हणायची तो एक शापित देवदूत आहे. त्याला चित्रकार बनवण्याची स्वप्न ती पाहत होती. त्यात रंगून जात होती. त्याला चित्र प्रदर्शने पाहायला घेऊन जात होती. त्या चित्रांचे अर्थ समजून सांगायचा प्रयत्न करायची. त्याने काढलेली चित्रे त्या मोठ्या चित्रकारांना दाखवायची.

शुभम वयानी, शरीरानी मोठा होत होता. मधूनच कधीतरी तो व्हॉयलंट होत असे. त्यावेळी वस्तू फेकायचा, आरडाओरडा करायचा. अशावेळी मनोज खूप संतापायचा. कधीकधी त्याचा शुभमवर हात उठत असे. मुग्धा दोघांच्या मध्ये पडायची.

मनोज म्हणायचा “मुग्धा मध्ये पडू नकोस. त्याला चांगले दोन रट्टे दिल्याशिवाय तो सरळ नाही व्हायचा. इतके करतेस तू त्याच्यासाठी आणि तो तुला वस्तू फेकून काय मारतो, तुझ्या अंगावर काय धावून येतो. मला नाही हे सहन होत. तुला किती वेळा सांगतो त्याला आपण परत आश्रमात सोडून देऊ. कुठल्या कुणाचे पाप आणि आपल्या डोक्याला ताप.”

मुग्धा कळवळून म्हणायची “नाही रे नको मारुस त्याला. तो हे मुद्दाम त्रास देण्यासाठी नाही रे करत.”

शुभमचं ती खरंच खूप मनापासून करत होती. कधी कंटाळा नाही की कधी तक्रारीचा सूर नाही. मला खरंच कधी कधी तिची खूप दया यायची. हे सगळे मी जवळून बघत होते अनुभवत होते. कधी कधी तिला ताण असह्य व्हायचा मग माझ्या खांद्यावर डोकं ठेऊन मुग्धा मन मोकळे करत होती. माझ्या मागे याचे कसे होईल, याची काळजी कोण घेईल, याला कोण सांभाळेल याची काळजी तिला सतत लागलेली असायची. मी मात्र तिच्या जिद्दीला सलाम करत होते. या सगळ्या प्रवासात एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवत होती. या प्रवासात मनोज कधीच मुग्धा बरोबर नव्हता. तो मुग्धाची खूप काळजी घ्यायचा, पण शुभमच्या बाबतीत मात्र तो पूर्ण अलिप्त राहत होता.

आणि शेवटी तो काळा दिवस उजाडला. मुग्धा औषधे आणायला म्हणून शुभमला घेऊन बाहेर पडली. नाक्यावरच्या दुकानात ती औषधे घेत होती, तेवढ्यात समोरच्या फुटपाथवर एक माणूस चित्र विकायला घेऊन बसला होता ते पाहून शुभम अचानक मुग्धाचा हात सोडून धावला आणि............

आणि एका शापित देवदूतच दुर्दैवी अंत झाला.

मुग्धा शुद्धीवर आल्यापासून रडली नव्हती. रात्री सुद्धा इंजेकशन देऊन झोपवावे लागत होते. मुग्धा दुःखात बुडाली होती पण मनोज मात्र त्यामानाने रिलॅक्स होता. आता मुग्धाने स्वतःला सावरणे महत्वाचे होते. सकाळी सकाळी चहा नाष्टा घेऊन त्यांच्याकडे गेले तर मुग्धा आढ्याला नजर लावून बसली होती. मनोज म्हणाला बघ ना मृणाल आज पंधरा दिवस होऊन गेले पण ही अजून रडली पण नाही, अशीच बसून आहे. हिला कसे सावरायचे कळतच नाहीये. तिने आता

स्वतःला सावरायला हवे. आयुष्य कुणासाठी थांबते का, ? ते पुढे जातच राहते. अरे पण तू कुठे चालललायस? मी विचारले. तो बाहेर जायच्या तयारीत होता. अग ऑफिसला निघतो घरी किती दिवस बसणार. असे म्हणून तो निघून गेला. मी मुग्धाला मिठीत घेतले. काही क्षण निरव शांतता, आणि मुग्धाचा बांध फुटला. "कुठे आहे ग माझा देवदूत? असे कसे माझे दुर्लक्ष झाले आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले.

काय करू आता, कुणासाठी जगू, सगळं संपलं ग पुन्हा माझी ओटी रिकामी ती रिकामीच राहिली ग. " थोडा वेळ असाच शांततेत गेला. मी तिच्या बोलण्याची वाट पहात होते.

मग स्वतःला सावरत ती म्हणाली "मृणाल वेळ आहे का तुझ्याकडे? मला आज तुझ्याशी खूप बोलायचंय."

"हो बोल ना ग. तू बोलावसं म्हणूनच मी आले आहे." आणखी थोडा वेळ असाच गेला.

"मनोजशी लग्न झाले आणि मला स्वर्ग दोन बोटे उरला. इकडे शहरात आमचा राजा राणीचा संसार सुरु झाला. नव्या नवलाईची पहिली दोन वर्ष खूप मजेत गेली. मग आडून आडून घरातून विचारणा होऊ लागली. मांडीवर नातवंड कधी देणार म्हणून

"' इश्श ' इतक्यात काय, राहू देत की आम्हा राजा राणीला अजून काही दिवस. असे म्हणून मी वेळ मारून नेत असे.

“बघता बघता आमच्या लग्नाला तीन वर्ष होऊन गेली. आता आम्ही पण मोठ्या आतुरतेने इवल्या पावलांची वाट पाहू लागलो. मला लहान मुले खूप आवडायची. पण दर महिन्याला माझ्या पदरी निराशाच येत होती. मनोज म्हणाला चल आपण डॉक्टरांकडे जाऊ. मेडिकल सायन्स खूप पुढे गेले आहे. नक्कीच मार्ग निघेल. पण मला भीती वाटत होती. हो हो म्हणत असेच आणखी सहा महिने गेले. शेवटी एक दिवस आम्ही डॉक्टरांकडे गेलो. त्या बरोबरच देव देव उपास तपस सुरु झाले. मनोजला हे पसंत नव्हते. त्याचा या गोष्टींवर विश्वास नव्हता. माझ्यासाठी तो हे सगळे नाईलाजाने का होईना पण करायचा. शेवटी माझी भीती खरी ठरली. मला मूल होऊ शकणार नाही असे डॉक्टरांनी सांगितले. मी हताश झाले. स्वतःला कोशात ढकलले. वांझपणाचा शिक्का आयुष्यभरासाठी माझ्या कपाळावर लागला होता. छोट्या छोटया मुलांना खेळतांना पहिले की माझ्या मनात कालवाकालव व्हायची. मग मी दिवसोंदिवस उदास पणे बसून रहायची. स्वतःला घरात कोंडून घ्यायची. सार्वजनिक आयुष्यावर फुलीच मारली. ते बाहेर जाणे ही नको आणि लोकांच्या नजरा आणि टोमणे पण नकोत. मग आई बाबा, सासू सासरे, मनोज सगळयांच्या सहमतीने मूल दत्तक घेण्याचा प्रस्ताव पुढे आला. सुरवातीला मला ते मान्य नव्हते. मला माझ्या रक्तामासाचे मूल हवे होते. कुणा अनोळखी मुलाला मी आईचे प्रेम देऊ शकेन याची मला खात्री नव्हती.

“पण एक दिवस बाहेर नेण्याच्या निमित्तानी मनोज मला अनाथाश्रमात घेऊन गेला. एका छोट्या बाळाला रडताना पाहून मला रहावले नाही. मी पटकन त्याला उचलून घेतले. आणि दोन मिनिटातच ते बाळ शांत झाले. त्याच क्षणी मनानी ग्वाही दिली, हेच माझे बाळ. मी देवकी नाही होऊ शकत पण याची यशोदा तर होऊच शकत होते. मग कायदेशीर बाबी पूर्ण करून आम्ही त्याला दत्तक घेतले.

“तो घरी आला आणि मनोजची प्रमोशनवर बदली झाली. त्याचे येणे आमच्यासाठी शुभ ठरले म्हणून त्याचे नाव शुभम ठेवले. आणि आम्ही इथे राहायला

आलो. पण दैवदुर्विलास बघ शुभम मतिमंद निघाला. कायद्याने अशी मुले आपण आश्रमात परत करू शकतो. त्यामुळे घरचे सगळे त्याला आश्रमात सोडू म्हणून आग्रह करत होते. पण माझे मन मनात नव्हते. माझे स्वतःचे मूल असते तर कुठे टाकले असते? त्याला संभाळलेच असते ना? परमेश्वरानेच माझ्यावर जणू त्याची जबाबदारी टाकली होती. पण मी नाही ती नीट सांभाळू शकले ग. माझी लायकीच नाहीये कुणाची जबाबदारी घेण्याची आणि प्राणपणाने ती पूर्ण करण्याची. गेली पंधरा वर्षे शुभम नावाचे एक असिधारा व्रत मी स्वीकारले होते. पण ते व्रत मी पूर्ण नाही करू शकले. आणि म्हणूनच कदाचित देवाने मला मातृत्व नाही दिले.

“मी त्याला शापित देवदूत म्हणत होते. पण तो नाही ग मीच शापित आहे. मी मनोजचे ऐकले असते आणि त्याला आश्रमात परत सोडले असते तर कदाचित तो आज जिवंत असता ग. मीच त्याच्या मृत्यूला कारणीभूत आहे.”

“नाही ग मुग्धा असे नको म्हणूस. अग तुझी काही चूक नव्हती. तो एक जस्ट दुर्दैवी ॲक्सीडेन्ट होता. तू शुभमचे खूप केलेस. अगदी मनापासून. कदाचित सख्खी आई सुद्धा करणार नाही एवढे केले आहेस तू. खरंच तू खूप ग्रेट आहेस मुग्धा. तो देवदूत होता की नाही मला माहित नाही पण तू मात्र त्याच्यासाठी नक्कीच देवदूत आहेस.”

इथे देवकी पेक्षा ही यशोदा श्रेष्ठ ठरली आहे. स्वतःला मूल नसून सुद्धा मुग्धा आज मातृत्वाच्या अत्युच्च पदावर विराजमान आहे.

# वैदेहीची गोष्ट

वैदेही माझी जिवाभावाची शाळेपासूनची मैत्रीण. मोठ्या हौसेनं तिने मुलीच्या लग्नाची जय्यत तयारी केली होती. मी अगदी आग्रहानी तिला तिच्या स्वतः करता लग्नात प्रत्येक प्रसंगासाठी वेगळी साडी आणि त्यावर मॅचींग अक्सेसरीज घ्ययला लावल्या होत्या. ती नाही नाहीच म्हणत होती. छे ग हे काय आता नटण्या मुरडण्याच वय आहे का? आता कुणासाठी नटायचं? लोक काय म्हणतील? तिची बडबड चालू होती. अर्थात मी तीचं काही ऐकणार नाही हे ती जाणून होती.

मी तिला म्हणाले "हे बघ आता कसला ही विचार करू नकोस मला माहिती आहे अगदी शाळेपासून तुला नटायची नीटनेटके रहायची आवड आहे. लोक काय गाढवावर बसले तरी आणि पायी चालले तरी नेहेमीच काही ना काही बोलतच असतात. आपण त्यांच्याकडे लक्ष नाही द्यायचे. अग हौसेला जसं मोल नसतं तस वय पण नसतं. आणि अशी कुठे तू म्हातारी झाली आहेस? ते काही नाही या लग्नापुरती मी तुझी ब्यूटीशिअन आहे असे समज आणि मी सांगेन ते आणि तसे सगळे तुला करून घ्यावे लागेल".

तिच्याकडे बघता बघता माझी बडबड चालू होती. ती तोंडदेखल हो तर म्हणाली पण मला कळत होत की या गोष्टीला तिची अजून मानसिक तयारी

नाहीये. आणि ती इतक्या लवकर होणार पण नव्हती. एका विधवा बाईने चांगले रहावे, दागदागिने घालावेत या गोष्टींना आपल्या समाजात अजूनही म्हणावी तशी मान्यता नाहीये.

गौरी म्हणाली, “आई तू जरा छान नीटनेटकी रहाना. मुळात तू दिसायला छान आहेस. इतकी साधी रहातेस तरी किती गोड दिसतेस बघ. माझ्या सगळ्या मैत्रिणी म्हणतात तुझी आई तुझी मोठी बहीणच वाटते. पण आता माझ्या लग्नात मावशी सांगते तसंच करायचं हं. लग्नात तू छानच दिसली पाहिजेस. आम्ही आता तुझे काहीही ऐकणार नाही.”

तिने आईला आग्रहानी चांगल्या साड्या घ्यायला लावल्या. वैदेही मला सारखे समजवायचा प्रयत्न करत होती “वैजू अग हे काय खूळ काढलं आहेस? अग मला आता या गोष्टींचा खरच मोह नाही राहिला. लग्न झाल्यापासून गेली तीस वर्ष मी अशीच रहात आले आहे. आता मला असंच रहायची सवय झाली आहे.” असे म्हणून तिने माझी बोळवण केली होती. खरे तर मला तिची व्यथा कळत होती.

दिवस तुझे हे फुलायचे

झोपाळ्यावाचून झुलायचे.

वैदेही अग काय कुठे हरवलीस? मैत्रिणींच्या चेष्टेला उधाण आले होते आणि वैदेही लाजून लाल होत होती.

आमच्या मैत्रिणींमध्ये पहिले वैदेहीचे लग्न ठरले. तसे तिचे लग्न जरा लवकरच ठरले होते. तिच्या मेडिकलच्या मैत्रिणी MBBS पूर्ण करून M. D. चे प्लॅनिंग करत होत्या आणि वैदेही मात्र संसाराची स्वप्न रंगवत होती.

त्याचे असे झाले की आमच्या कॉलनीतल्या बर्वे काकूंच्या मुलाचा दिपकचा मित्र मकरंद, त्यांच्याकडे चार दिवस राहायला आला होता. पहिल्या दिवशीच कॉलनीच्या गेटवर त्याची आणि वैदेहीची समोरासमोर गाठ पडली. घरी गेल्यावर त्याने दीपककडे तिच्याबद्दल चौकशी केली आणि मग पुढे चार दिवस तो तिचा पाठलाग करत होता.

मकरंद काम आटोपून निघून गेला पण वैदेहीला त्याचा थांगपत्ता पण नव्हता. आणि एक दिवस अचानक देशपांडेंच्या घरासमोर एक मोठी गाडी येऊन उभी राहिली. मकरंद आणि त्याचे आई वडील वैदेहीला मागणी घालायला आले होते. वैदेहीला M D करायचे होते. तिने तिचा स्पष्ट नकार कळवला. मकरंद तिच्या प्रेमातच पडला होता. तो हरतऱ्हेने तिला मनवण्याचा प्रयत्न करत होता. ती म्हणत होती की मला पुढे शिकायचे आहे. डॉक्टर म्हणून करिअर करायचे आहे आधी. मग लग्नाचा विचार करेन. पण मकरंद म्हणाला लग्नानंतर शिक, माझी काहीच हरकत नाही. तू तुला हवे तसे करिअर कर. मी तुला सपोर्टच करेन. तिचे आई वडील सुद्धा चालून आलेले स्थळ हातचे घालवायला तयार नव्हते. शेवटी हो नाही करता करता ती लग्नाला तयार झाली. पण त्या आधी तिने मकरंदकडून पुढे शिकण्याची परवानगी घेतली आणि मगच ती लग्नाला तयार झाली. खरे तर मकरंद एकदम हँडसम आणि गोडबोल्या होता. नाही म्हणता म्हणता वैदेही त्याच्या प्रेमात पडली होती. मकरंद डॉक्टर नव्हता पण M B A होता. चांगल्या कंपनीत चांगली नोकरी होती. त्याचा छोटा भाऊ बँकेत ऑफिसर होता. मकरंद आई वडलां बरोबर

नासिकला राहत होता. त्यांचा छान टुमदार बांगला होता. दारात गाडी होती. नकार देण्यासारखे काहीच नव्हते.

मकरंद वैदेही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. रोज फोनवर बोलणे आणि शनिवार रविवार प्रत्यक्ष भेट. कधी तो मुंबईला तर कधी ती नासिकला.

एका शनिवारी वैदेही त्याला म्हणाली "ही आपली शेवटची भेट हं."

"म्हणजे काय?" चमकून मकरंद ने विचारले.

"अरे म्हणजे आता आपण महिनाभर भेटायचे नाही."

तो म्हणाला "छे! नाही हं, तुला भेटल्याशिवाय मी राहूच शकत नाही. पण या पामराला ही शिक्षा का? राणी साहेब अशा का रागावल्यात? काही चुकले का या पामराचे?" मकरंदने नाटकीपणे तिला विचारले.

"अरे असं काय करतोस माझी एंट्रन्स जवळ आली आहे, या लग्नाच्या गडबडीत अभ्यासाकडे थोडं दुर्लक्षच झालं आहे. आता अगदी नेटाने अभ्यास करायला हवा."

"नाही नाही तू आत्ता काही एंट्रन्स देऊ नकोस. पुढच्यावर्षी बघू." मकरंद जरा नाराजीनेच म्हणाला.

"अरे असं काय! तू म्हणाला होतास ना की मी पुढे शिकायला तुझी काही काही हरकत नाही म्हणून? त्या अटीवरच तर मी लग्नाला तयार झाले."

"हो बरोबर आहे पण यावर्षी नको पुढच्या वर्षी एंट्रन्स दे एवढंच म्हणतोय मी."

“पण का या वर्षी का नको? मध्ये गॅप पडली की मग अभ्यास करायचा कंटाळा पण येतो आणि अवघड पण जाते. नाही नाही मी आत्ताच एंट्रन्स देणार आहे.”

दोघांमध्ये थोडी वादावादी झाली. मग थोडावेळ दोघेही शांत बसून होते.

मग मकरंदने तिला अलगद जवळ घेतले आणि म्हणाला, “राणी असं काय करतेस, अग तू आत्ताच पोस्टग्रॅज्युएशनला सुरवात केलीस तर लग्नानंतर लगेच तू मुंबईत आणि मी नासिकला, तीन वर्ष तुझा विरह मी कसा सहन करणार, त्यापेक्षा एक वर्ष आपण आपलं लग्न मस्त एन्जॉय करू. एकमेकांच्या प्रेमात जग विसरून जाऊ. लग्नानंतर तू तरी राहू शकशील का माझ्या शिवाय?”

वैदेहीला त्याने पटवले, नाही नाही त्याचा विचार तिच्या गळी उतरवला. त्याच्या प्रेमाची, गोड बोलण्याची तिला भुरळ पडली होती. आणि इथेच वैदेहीने आयुष्यातली पहिली चूक केली.

थाटामाटात लग्न झाले आणि वैदेही देशपांडेची मानसी मकरंद जहागीरदार झाली आणि नावा बरोबरच स्वतःच मूळ रूप आणि स्वभाव पण विसरली. तिच्या सासरची माणसे खूपच जुन्या विचारांची होती. कधीकाळी कुठल्या तरी पूर्वजांना मिळालेल्या जहागिरीचा माज त्यांच्या नसानसात भिनला होता. खानदानाच्या नावाने तिच्यावर खूप बंधने आली. रोज साडीच नेसायची. पुरुषांशी बोलायचे नाही. मोठ्याने हसायचे नाही. तिची खूपच घुसमट होऊ लागली.

मकरंदशी बोलण्यातही काही अर्थ नव्हता. त्याचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे होते. तो पण त्याच विचारांच्या पठडीतला होता. त्याचे

काही कळतच नव्हते. कधी त्याचे प्रेम इतके उतू जाई की त्यात ती गुदमरून जाई. तर कोणत्या क्षणी तो भडकेल आणि त्याचा हात उठेल याचा नेमच नव्हता.

एकदा समीर अचानक तिचा पत्ता शोधत शोधत तिच्या घरी आला. समीर तिचा कॉलेजचा मित्र. तिला खूप आनंद झाला. किती बोलू आणि किती नाही असे होऊन गेले तिला. समीरचे पाऊल घराबाहेर पडत नाही तोच सासू सासऱ्यांनी तोफ डागली. “कोण होता, कशाला आला होता, तू त्याच्या बरोबर खिदळत काय होतीस, शोभतं का आता तुला हे?” सासूबाईंच्या तोंडाचा पट्टा सुरूच होता.

मकरंद घरात येत नाही तोच दोघेही त्याच्या कानाला लागले. तिघांनी मिळून जे काही आकांडतांडव केले, ती एकदम हबकुनच गेली. एखाद्या मित्राला भेटणे त्याच्याशी गप्पा मारणे ही इतकी साधी सरळ गोष्ट होती की त्यात एवढे चिडण्यासारखे काय आहे तेच तिला काळात नव्हते.

बघता बघता लग्नाला दोन वर्ष झाली. पण तिच्या पोस्ट-ग्रॅज्युएशनबद्दल कोणी काहीच बोलायला तयार नव्हते. ती म्हणत होती मी कुठेतरी हॉस्पिटल मध्ये नोकरी बघते तर बायकोच्या पैशावर जगायला मी काही बांगड्या भरल्या नाहीत हातात. मी समर्थ आहे तुला पोसायला, तुला काही कमी पडतंय का, असे म्हणून तो तिला गप्प करी. दोन वर्ष झाली पाळणा कधी हलणार, जहागीरदारांना आता वारस देण्याची तयारी करा. म्हणून सासूबाई मागे लागल्या. आज मकरंद अगदी लाडात आला होता. आई बाबांच्या इच्छेचा विचार करायला हवा हं आता. वारस देण्याची तयारी करायला हवी असे म्हणत अलगद तिला जवळ घेतले. जेवणानंतर तिला घेऊन आईस्क्रीम खायला गेला. त्याचा मूड बघून रात्री तिने हळूच पोस्टग्रॅज्युएशनचा विषय काढला. दुसऱ्या क्षणी त्याचा मूड बदलला. हे बघ हा विषय इथे बंद. आणि तो सरळ तिच्याकडे पाठ करून झोपला. ती मात्र संपूर्ण रात्र रडत होती आणि स्वतःच्या नशिबाला दोष देत होती.

तिला तिचे भवितव्य अगदी स्पष्ट दिसत होते. मकरंद खोटं बोलला होता. त्याने तिची फसवणूक केली होती. आपण फसवले गेलोय याची तिला प्रचंड चीड येत होती आता तिच्या पुढे दोनच पर्याय होते. एक तर सगळं सहन करून संसार करणे नाहीतर सगळे झुगारून देऊन सेपरेट होणे. म्हणजेच स्वाभिमान की सामाजिक सुरक्षितता. तिने दुसरा पर्याय निवडला. आम्ही सगळ्या तिला म्हणत होतो, तू चांगली डॉक्टर आहेस. practice सुरु कर आणि स्वाभिमानानी रहा. पण तिने आई, वडील, धाकटी बहीण यांचा विचार केला आणि नशिबानं वाट्याला आलं तस आयुष्य स्वीकारायचं ठरवलं.

एकदा मकरंद बरोबर त्याच्या ऑफिसच्या पार्टीला ती गेली असताना मकरंदने साहेबांना डॉक्टर म्हणून तिची ओळख करून दिली. प्रॅक्टिस कुठे करता विचारल्यावर, तिने घरीच असते म्हणून उत्तर दिले. अरे ये क्या मकरंद डॉक्टर बीवीको घर में क्यूँ बिठाके रखा है? मकरंद म्हणाला नही नही अब वो जॉब धुंड रही है. ती त्याच्या तोंडाकडे बघतच राहिली. किती सफाईदार खोटं बोलतो हा. ती काही बोलली नाही.

साहेब म्हणाले " अरे कल ऑफिस आ जाओ हमे मेडिकल ऑफिसर अपॉईंट करना है. दोनो की जरुरत पूरी हो जायेगी."

आता मकरंदकडे हो म्हणण्याशिवाय पर्याय नव्हता. वैदेही मनोमन खुश झाली. पण तिने चेहेऱ्यावर काही दाखवले नाही. बघू कसं जमतंय असे म्हणून गप्प बसली. तिला मकरंदची खात्री नव्हती, पण साहेबांपुढे त्याचे काही चालले नाही आणि एक तारखेपासून ती त्याच्याच ऑफिस मध्ये जॉईन झाली. घरात सगळ्यांनीच खूप कटकट केली. पण पर्याय नव्हता. बॉस समोर मकरंदला काही बोलता आले नाही.

मकरंद तिला आपल्या बरोबर घेऊन जाई आणि आपल्या बरोबर परत आणत होता. वैदेही मात्र खुश होती. कामाच्या व्यापात घरातील कटकटी विसरत होती. असेच सहा महिने गेले आणि पुन्हा अडचण उभी राहिली. वैदेहीला दिवस गेले होते. घरात सगळयांनाच खूप आनंद झाला. तिला वाटले आता तरी हे लोक आपल्याशी चांगले वागतील. मकरंदला तेवढंच निमित्त पुरले. त्याने नोकरी सोड म्हणून तिच्या मागे लकडा लावला. अहो माझी तब्येत चांगली आहे, मला काही त्रास होत नाहीये. आणि नंतर मला मॅटर्निटी लिव्ह मिळेलच.

पण त्याला काहीच ऐकून घ्यायचे नव्हते. एकीकडे तिच्या तब्येतीची काळजी वाटते असे दाखवून जबरदस्तीने तिला नोकरी सोडायला लावली. सासूबाईंनी पण तू नोकरीला गेलीस तर आम्ही तुझे मूल सांभाळणार नाही असे स्पष्ट सांगून टाकले.

तिचा नाईलाज झाला. आता ती जहागीरदारांना वारस देणार म्हणून सगळे खूप खुश होते तिची खूप काळजी घेतली जात होती पण मुलगाच हवा हं म्हणून दुसरीकडे बजावले जात होते. वैदेही बाळंतीण झाली. मुलगा झाला सगळीकडे आनंदीआनंद झाला. जहागीरदारांना वारस मिळाला. छोटया गोंडस बाळाकडे बघून वैदेही आपले दुःख विसरली. जहागीरदारांच्या इतमामाला शोभेल असे बारसे झाले. बाळाचे नाव गौरांग ठेवले.

गौरांग दोन वर्षाचा झाला आणि पुन्हा बाळाची चाहूल लागली. छोटीशी गोंडस परी जन्माला आली. मुलीचे नाव गौरी ठेवले. दोन्ही मुलांची नावे ठेवताना तिचे मत कोणी विचारले नव्हते. गौरी दोन वर्षाची झाली. वैदेही मुलांमध्ये मनापासून रमली होती. पण डिग्री स्वस्थ बसू देत नव्हती. मग मकरंदच्या हातापाया पडून घरीच काम सांभाळून प्रॅक्टिस करण्याची परवानगी मिळवली. आणि घरीच प्रॅक्टिस सुरु केली. घर मोठे होते त्या मुळे जागेचा प्रश्न

नव्हता. तिची प्रॅक्टिस पण चांगली चालायला लागली होती. तिचे निदान एकदम चांगले होते. फार थोड्या वेळात तिने लोकांचा विश्वास संपादन केला होता. पण प्रॅक्टिस जशी वाढायला लागली, बाहेर लोकांच्या मनात तिच्याबद्दल आदर वाढला. लोक तिचे कौतुक करू लागले. पण घरच्यांना हे सहन होईना. मग तिच्यावर घाणेरडे आरोप प्रत्यारोप करून, तमाशे करून प्रॅक्टिस बंद करायला लावली गेली. काय तर म्हणे तुझ्याकडे पुरुष पेशंटच का जास्त येतात? तू त्यांच्याशी गप्पाच जास्त मारतेस, तू आतल्या खोलीत त्यांच्या बरोबर काय थेर करतेस काय माहिती असे घाणेरडे आरोप करून तिला छळायला सुरवात केली. सुरवातीला ती हे सगळं निमुटपणे सहन करत होती कारण त्यांना समजावण्यात काही अर्थ नव्हता. तिच्याकडे कोणी पेशंट आले तर ती नाहीये असे सांगून त्यांना परस्पर परत पाठवून देत होते. त्यांच्या पुढे ती हतबल झाली.

धाकट्या जावेला दिवस गेल्याची बातमी आली आणि सासू सासरे धाकट्या मुलाकडे वर्षभराकरता रहायला गेले. सासू सासरे गेल्यावर हळूहळू मकरंद जरा नीट वागायला लागला होता. आता त्याचे कान भरायला आणि त्याला चिथवायला कोणी नव्हते. या गोष्टीचा फायदा घेऊन तिने मकरंदच्या मागे लागून घराजवळच एक गाळा भाड्यानी घेतला आणि स्वतःचे कन्स्लटिंग सुरु केले. वैदेही मुळातच हुशार असल्याने आणि तसेही आजूबाजूचे लोकं तिला एक चांगली डॉक्टर म्हणून ओळखत होतेच.

लवकरच तिचा चांगला जम बसला. हळूहळू तीचा आत्मविश्वास वाढला. वर्ष छान आनंदात गेले. अधून मधून मकरंद त्रास देत असे पण ती त्याची समजूत घालत असे. शिवाय त्याचे सगळे नखरे ती सांभाळत होती. त्याला चिडायला संतापायला संधीच देत नव्हती. पण वर्षभराने सासूसासरे परत आले आणि येरे

माझ्या मागल्या सुरु झाले. पण आता ती ऐकून गप्प बसे. आणि दवाखान्यात निघून जाई. मकरंदचे सुद्धा प्रमोशन झाले होते. कामाचा व्याप वाढला होता. आई वडिलांच्या तक्रारींकडे लक्ष द्यायला त्याच्याकडे वेळ नव्हता.

आता सासूबाई नातवंडांचे कान भरायला लागल्या. “बघा तुमच्या आईचे तुमच्याकडे लक्षच नसते. तिला कधी घरी यायला उशीर झाला तर लगेच म्हणायच्या बघा तुम्ही भुकेले अहात, पण ती काही वेळेवर आली नाही. मला अगदी बघवत नाही हो तुम्ही असे उपाशी बसलेले.”

पण मुले आता मोठी झाली होती. त्यांना गोष्टी कळत होत्या. ते आज्जीआजोबांची आईकडे तक्रार करत, आपल्या आईला बोललेले मुलांना आवडत नव्हते. पण वैदेहीने त्यांना सांगितले होते, आज्जी काही म्हणाली तर दुर्लक्ष करायचे पण उलट उत्तर नाही द्यायचे. पाच सहा वर्ष सुरळीत गेली आणि तिच्या समोर पुन्हा संकट हात जोडून उभे राहिले. अतिक्रमण मोहिमेत तिचा दवाखाना गेला. ती हतबल होऊन बसली.

मुले मोठी झाली होती. त्यांचे कॉलेज अभ्यास यात मग्न होती. सासूसासरे कधी तिच्याकडे, कधी दिराकडे असे जाऊन येऊन होते. ते पण आता वयोमानानुसार येणाऱ्या तब्येतीच्या तक्रारींमधे अडकले होते. मकरंद.... त्याला प्रमोशन्स मिळाली होती. आता त्याला बरेचदा परदेशात वगैरे ऑफिसच्या कामानिमित्त जावे लागत होते. वैदेहीला घरात बसवून त्याचा पुरुषी अहंकार सुखावला होता. आता तो तिला “बायका बघ कशा टापटीप रहातात, ऑफिसला नटून थटून येतात, कशा स्मार्ट दिसतात. नाहीतर तू बघ कशी गबाळ्यासारखी रहातेस. जरा पार्लर मध्ये जात जा, नीटनेटकी रहा. मला लाज वाटते तुला बरोबर न्यायची.” म्हणून हिणवत होता.

पण आता तिलाच कसलीच इच्छा राहिली नव्हती ना नटायची ना त्याच्या बरोबर कुठेही जायची. आता मोठी पोस्ट, मोठ्या लोकांबरोबर पार्ट्या यात तो बिझी होता. त्याचे वैदेहीकडे फारसे लक्षच नव्हते. फक्त एक पेग तर कधी कंपनी म्हणून करता करता त्याचे पिणे वाढले होते. वैदेही समजावण्याचा प्रयत्न करी पण त्याच्या लेखी तिलाच काही किंमत नव्हती तर तिच्या सांगण्याकडे तो पूर्ण दुर्लक्ष करत होता. उलट तू गावंढळ आहेस तुला काय कळणार कॉर्पोरेट मधले एटीकेट्स म्हणून गप्प करत होता. अन एक दिवस तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. मकरंद पार्टीला गेला होता. रात्रभर ती वाट पाहत जागी होती पण तो काही आला नाही. आधी तिला खूप चीड आली होती ही काय पद्धत आहे वागण्याची. हळूहळू संतापाची जागा काळजीने घेतली. “आई, येतील बाबा, काळजी करु नकोस” मुले धीर देत होती. पण मुले पण आता मनातून घाबरली होती. सकाळ झाली आणि जसजसा वेळ जाऊ लागला तसा तिचा धीर संपला.

नेहेमीप्रमाणेच कुठे जातोय, कुणा बरोबर जातोय, तो काहीच सांगून गेला नव्हता. त्यामुळे त्याची चौकशी कुठे करावी कळात नव्हते. तेवढ्यात बातमी घेऊन त्याचा एक मित्र आला. नशेत गाडी चालवत असताना त्याचा जोरदार ऍक्सीडेन्ट झाला होता. जवळपास महिनाभर तो I C U मधे होता. कसाबसा वाचला होता. पण घरी आला तो व्हील चेअर वरून. कायमस्वरूपी अपंगत्व आले होते.

पुन्हा एकदा वैदेहीची परीक्षा सुरु झाली. स्वतःवरचा राग तो वैदेहीवर काढत होता. पण ती मात्र शांतपणे अतिशय मनापासून त्याची सेवा करत होती. पण कधीकधी तिचे पेशन्स संपत आणि मग ती स्वतःचे फ्रस्ट्रेशन त्याच्यावर काढत असे. तो खाली मन घालून बसून रहात असे. वाघाची शेळी झाली होती.

थोड्यावेळानी शांत झाली की त्याच्याकडे पाहून तिला त्याची कीव येई. कधी कधी त्याच्या डोळयात पाणी येई. मी तुला खूप त्रास दिला ग. तुझ्या

आयुष्याचे नुकसान केले माफ कर मला. म्हणून तिचे अक्षरशः पाय धरून माफी मागत असे. अशीच चार वर्ष गेली. गौरांग नोकरीला लागला. गौरीचे इंजिनिअरिंगचे शेवटचे वर्ष होते. तिचे कॅम्पस मधून सिलेक्शन झाले होते. रुटीन सुरू होते. रात्रीपासूनच मकरंदला थोडे अस्वस्थ वाटत होते. आणि पहाटे पहाटे त्याला जास्तच त्रास होऊ लागला. घाईघाईत त्याला हॉस्पिटल मध्ये ऍडमिट केले. पण हार्ट ऍटॅक चे निमित्त झाले आणि मकरंद हे जग सोडून गेला.

फॉर्मॅलिटीज पूर्ण करून बॉडी घरी आणली. अंतयात्रेची तयारी झाली होती. सगळे जमले होते. वैदेही मात्र शून्यात नजर लावून सुन्नपणे बसली होती. अगदी पहिल्या रात्रीपासून ती इतकी रडली होती की आता तिला रडूच येत नव्हते. सगळयांना वाटले की ती दुःखानी सुन्न झाली आहे. कुणीतरी जवळ येऊन तिच्या जवळ मंगळसूत्र मागितले तिने ते शांतपणे काढून दिले. कुणीतरी सांगितले म्हणून तिने त्याचे शेवटचे दर्शन घेतले. हळूहळू सगळे सोपस्कार पूर्ण झाले. या सगळयात वैदेही मात्र अगदी शांत होती. मनानी या सगळ्या सोपस्कारात ती कुठेच नव्हती. सगळयांना वाटत होते की मुलांसाठी तिने सगळे धीराने घेतले आहे. पण तिचे तिलाच कळत नव्हते की त्याच्या जाण्याने तिला दुःख झाले आहे की त्याच्या जाचातून सुटल्याची भावना आहे. जसजसे दिवस जात होते तशी ती हळूहळू सावरत होती.

वैदेहीच्या आयुष्याची मी साक्षीदार होते. तिच्या सहनशक्तीचा कडेलोट व्हायचा तेंव्हा ती कधी कधी माझ्याकडे येत असे पण कधीही तिने सासूसासरे किंवा नवऱ्याबद्दल तक्रार केली नाही. स्वतःचे रडगाणे गाणे तिला कधीच मान्य नव्हते. ती म्हणायची हा पर्याय मी माझ्या इच्छेन निवडला आहे. तेंव्हा त्यासाठी त्यांना दोष का द्यायचा. मुले मोठी होत होती, त्यांच्या समोर तरी वाद आणि भांडणे नकोत म्हणून तिने माहेरी जाणे सुद्धा जवळ जवळ बंद केले होते.

मी तिचे दु:ख समजू शकत होते कारण आपल्याकडे बहुतेक सगळया मुलींच्या वाट्याला थोडा फार तरी त्रास येतोच. मला आठवतंय लग्न ठरल्या ठरल्या तिच्या सासूबाई म्हणाल्या होत्या आजच्या fashion प्रमाणे नवऱ्याला नावानी हाक मारलेली आमच्याकडे चालणार नाही हं. यावर आम्ही मैत्रिणीनी तिला चिडवलं पण होत. पण त्या वेळी वाटल 'जाऊदे ही काय किरकोळ गोष्ट आहे किंवा ' हे ' म्हणतील 'आपण दोघे असताना मला तू नावानी हाक मार मला आवडेल'. असे तिला वाटले.

सगळया मुलीं प्रमाणे तिने सुद्धा पहिल्या रात्रीची किती तरी स्वप्न पाहिली होती, सिनेमातून कथा कादंबऱ्यातून वाचलेली वर्णनं मनात आठवतच तिने खोलीत प्रवेश केला, पण .... तिच्या नवऱ्यानी प्रथम काय केले असेल तर तिच्या केसातले सगळे गजरे अक्षरशः ओरबाडून काढले आणि म्हणाले “या पुढे केसात फुले घातलेली चालणार नाहीत. फुलं घालून काय बाजारात बसायचं आहे का?”

प्रथम एक मिनिट ते काय म्हणतायत तेच तिला कळले नाही. पण कळले तेंव्हा मेल्याहून मेल्या सारखे झाले. हा अपमान ती कसा कोणाला सांगणार होती? वैदेहीला त्या आठवणी कायमच छळतात त्या तिच्या मनातून कधीच पुसल्या जाणार नाहीत. तिच्या नवथर भावनांचा केंव्हाच चक्काचूर झाला होता. झालेल्या अपमानानी आणि अपेक्षा भंगाने ती पूर्ण खचून गेली होती. मग जे काही झाले ते काय झाले कसे झाले काही कळलेच नाही. भानावर आली तेंव्हा नवरा तिच्याकडे पाठ करून घोरत होता. आणि ती पुढचं आयुष्य या माणसा बरोबर कसं

काढायचं या कल्पनेनीच रात्र भर तळमळत होती. मन आणि शरीर अपमानाच्या आगीत जळत होते. पुढची तीस वर्ष ती जळत राहिली आणि सगळं सहन करत राहिली. पण चेहेऱ्यावर मात्र कधी काही दिसू दिले नाही.

आज अशा पद्धतीने सगळयाचा शेवट झाला होता. दोन्ही मुले गुणी आहेत. आईची खूप काळजी घेत होती. तिला सगळयातून सावरायला मदत करत होती. एक दिवस तिला भेटायला गेले तेंव्हा म्हणले वैदेही अग एक मोठे वाईट स्वप्न म्हणून सगळं विसरायचा प्रयत्न कर. सावर स्वतःला. तेंव्हा ती म्हणाली आता काय करू ग सावरून. कुणासाठी उभी राहू. मुठीतून रेती सुटत जावी तसे माझे आयुष्य माझ्याच हातातून निसटून गेले आहे ग. आता काही करायची उमेद नाही राहिली. आयुष्यात पुन्हा उभे रहाताना कुणाचा हात आधारासाठी हातात घेऊ आता? अग असं कसं म्हणतेस, तुझ्या शिवाय मुलांना कोण आहे आता. जावई आणायचा आहे, सून आणायची आहे. अजून खूप काही करायचे आहे तुला. गौरीचे लग्न थाटात लावून द्यायचे आहे. तूच जर अशी खचलीस तर गौरांग आणि गौरीने कुणाकडे बघायचे. त्यांच्यासाठी तरी तुला स्वतःला सावरायलाच हवे. बरोबर ना?

भूतकाळाचा पट वैदेहीच्या डोळयांसमोरून सरकत होता, त्यात ती पूर्ण पणे स्वतःला हरवून बसली होती. डोळयातून पाण्याच्या धारा वाहत होत्या. गौरी कधी तिच्या जवळ येउन बसली तिला कळलच नाही. हळुवार पणे तिचा हात हातात घेऊन तिने हाक मारली........ आई...... तशी वैदेही शुद्धीवर आली आणि ती डोळे पुसायला लागली. गौरी ने तिचे हात पकडले आणि म्हणाली “नको पुसुस वाहून जाऊ देत, निचरा होऊ देत सगळयाचा. आई मला सगळं माहिती आहे, तू काय किती आणि कसं सोसलं आहेस.”

वैदेही गौरीकडे डोळे विस्फारून बघतच राहिली. “आई तुझं अजून काही वय झालं नाहीये, तू पुन्हा नव्या उमेदिनी उभी रहा. आम्ही आहोत तुझ्या बरोबर.”

आज गौरी तिची आई झाली होती.

“आई तू मुळात हुशार आहेस, थोडा प्रयत्न कर, तुला नक्की जमेल. मला खात्री आहे.” गौरी तिला समजावत होती. “तू पुन्हा तुझी प्रॅक्टिस सुरु कर. थोड फार समाजकार्य कर त्यातून तुला आनंद मिळेल. जगण्याला एक नवा अर्थ मिळेल.” ती आई झालेल्या आपल्या लेकीकडे पाहतच राहिली होती.

“अरे रडण्याच्या कार्यक्रमाला अजून वेळ आहे,” वातावरणातला ताण हलका करण्याचा प्रयत्न करत गौरांग आत आला.

तशी वैदेही पटकन उठत म्हणाली “चला मी कॉफी करते.”

“नाही नाही तू बस मी करतो आज सगळयांसाठी मस्त कॉफी. मावशी, आज माझ्या हातची कॉफी पिऊन बघ.”

गौरांगने पटकन सगळयांसाठी कॉफी बनवली आणि कप घेऊन तो बाहेर आला. कॉफी चा कप हातात देत हळूच गौरांग म्हणाला आई आज तू खूप फ्रेश दिसते आहेस अशीच फ्रेश रहा. मला आणि गौरीला तू खूप खूप हवी आहेस. वैदेहीच्या डोळयातून खळकन पाणी आलं. इतकी वर्षं एक उपेक्षित आयुष्य जगल्यावर इतकं छान काहीतरी आपल्या वाट्याला येईल याची तिला कल्पनाच नव्हती. अजूनही आपली कुणाला तरी गरज आहे हे पाहून तिला खूप बरे वाटले. तिच्या मातृत्वाचे सार्थक झाल्या सारखे तिला वाटत होते.

दोन्ही मुलांचा हात हातात धरून वैदेही कितीतरी वेळ अशीच बसून राहिली होती. काय बोलावं तिला सुचतच नव्हत. वैदेहीच्या चेहेऱ्यावर एक समाधान पसरल होत. मग मीच सगळयांची तंद्री भंग करत म्हणाले चला आता उठा, पुढच्या तयारीला लागुयात. अजून सगळं packing व्हायचं आहे. बाईसाहेबांची रवानगी करायची आहे ना !!! मग काय जोरदार लग्नाची तयारी सुरु झाली आणि हां हां म्हणता तो दिवस आला पण. कार्यालयात जायच्या आधी वैदेहीचे पाय अडखळले.

गौरीच्या लक्षात आलं. गौरी म्हणाली आई काळजी करू नकोस अश्विन आणि त्याच्या घरची माणसे खूप चांगली आणि समंजस आहेत. माझी काळजी करू नकोस. अगदी नि:शंक मनानी चल. मग पूर्ण लग्नात वैदेही अगदी थाटात मिरवत होती. “काय बाई नवरा होता तोपर्यंत कशी अगदी बाळबोध पणे राहायची आणि आता बघा”, “विधवेला शोभते का असे मिरवणे” हे आणि असे काही टोमणे अधून मधून कानावर येत होते पण ह्याची आम्हाला कल्पना होतीच त्यामुळे त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करायचे हे आधीच ठरले होते. गौरीच्या सासरची माणसे उच्च शिक्षित आणि उदार मतवादी आहेत त्यामुळे त्यांना या गोष्टी अजिबात खटकल्या नाहीत.

“अरे वा अगदी निवांत कॉफी पीत बसली आहेस?”

“अरे ये ये वैजू आज अचानक कशी?”

“अग इकडून जात होते, सहज डोकवाव म्हणून आले.”

वैदेही म्हणाली “बरं झालं मी तुला फोन करणारच होते.”

“हो ! का ग काय विशेष?” मी विचारले.

“अग आज मी आश्रम शाळेत गेले होते, तिथल्या सगळया मुलांची मोफत वैद्यकीय तपासणी केली. शिवाय डॉक्टर म्हणून जॉईन होण्याची ऑफर एका N G O मधे उद्यापासून मी जॉईन होते आहे. मला खूप चांगल वाटतंय. आणि माझ्यातला हा बदल तुझ्यामुळे आणि मुलांमुळे झाला आहे.” तिचा वाढलेला आत्मविश्वास तिच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होता. तिने उठून मला गच्च मिठी मारली.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.